
# पंढरी संचार

● पंढरपूर ● बुधवार, १५ जानेवारी २०२५
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

NO PAIDNEWS

pandharisanchar.com RNI-MAH-MAR/1499/2000 ● वर्ष २९ ● अंक - २३५


आर टी ई कायदा तर्फे मोफत शिक्षण प्रवेश साठी संपर्क करा PII





अभियांत्रिकी, फार्मसी ग्रंथालयात होतेय नियमित वाचन PIII


# वाल्मिक कराडवर मकोका

## संतोष देशमुख हत्याप्रकरण : समर्थकांची परळी बंदची हाक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बीड**- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येशी संबंधित खंडणी प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड याच्याविरुद्ध महाराष्ट्र सीआयडीने मंगळवारी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत (मकोका) गुन्हा दाखल केला आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांकडून आणि विविध राजकीय पक्षांकडून सतत दबाव येत असल्याने महाराष्ट्र सरकारने सीआयडीला वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.

परळीमध्ये वाल्मिक कराडच्या समर्थकांचे आंदोलन सुरू असताना एका तरुणीने अंगावर रॉकेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्यावेळी तिथे

» पान ३ वर



### परळीमध्ये तणाव

● वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर परळीमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. कराडच्या समर्थकांनी परळी बंदची हाक दिली आहे. केज न्यायालयात वाल्मिक कारडवर आरोप असलेल्या खंडणी प्रकरणी सुनावणी होती. त्यापूर्वी सकाळपासून परळीमध्ये कराडच्या कुटुंबीयांसह समर्थकांनी परळी बंदची हाक दिली होती. इतकेच नव्हे तर वाल्मिक कराडची आईसह कुटुंहबीयांनी परळीत ठिय्या आंदोलन केले होते.



### राजकीय पुतळ्यांचे दहन

● परळी शहरांमध्ये बसवर दगडफेक आणि प्रमुख रस्त्यांवरती टायर जाळून रस्ते बंद करण्यात आले. राजकीय नेते आणि समाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या पुतळ्यांचे दहन करण्यात आले आहे. यामध्ये मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील, आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या फोटोच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले. वाल्मिक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे दाखल केलेले मागे घ्या अशी समर्थकांनी मागणी केली. परळी शहरातील मुख्य रस्त्यावर टायर जाळून आंदोलन करण्यात आलेत. परळी शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले होते परळी तालुक्यातील बस सेवा देखील बंद करण्यात आलेली आहे.



“ ज्या दिवशी ही घटना घडली त्या दिवसापासूनच कुणीही दोषी असले तरी हयगय न करता त्याच्यावर कारवाई करण्यात यावी, असे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी ठरवले होते. या घटनेला महिना होऊन गेला. त्यांचे कुटुंबिय चिंतेत आहे. पोलिस यंत्रणा पोलिसांचे काम करत आहे. सीआयडी आणि एसआयटीदेखील चौकशी करत आहे. जो कुणी दोषी असेल त्याला अजिबात थारा द्यायचा नाही. ही निर्घृण हत्या आहे. शिवशाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात कुणीही खपवून घेणार नाही. त्यामुळे कुणीही दोषी असेल आणि चौकशीत त्यांचे धागेदोरे आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. ही घटना निर्घृण आणि माणूसकीला काळीमा फासणारी आहे. त्यामुळे यामध्ये सत्ताधारी पक्षाचा असो, विरोधी पक्षाचा असो किंवा कुणी त्रयस्थ असो, यातील कुणालाही थारा दिला जाणार नाही," असे त्यांनी सांगितले.

**—अजित पवार** (उपमुख्यमंत्री)

# मांज्याचा बळी!

## २३ वर्षीय तरुणाचा गळा चिरून मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नाशिक** : नायलॉन मांजावर बंदी घालण्यात आली असली तरी देखील अनेक ठिकाणी सर्रासपणे नायलॉन मांजाचा वापर केला जात आहे. मात्र, हाच नायलॉन मांजा अनेकांसाठी धोकादायक ठरत आहे. आतापर्यंत अनेक जण या माजांमुळे गंभीर जखमी झाले आहेत. आता तर या मांजाने एकाच जीव घेतल्याची घटना नाशिकमधून समोर आली आहे. नायलॉन मांजा गळ्यात अडकून गळा कापला गेल्याने एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना काल (मंगळवार) पाथर्डी फाटा परिसरात घडली. सोनू किसन धोत्रे (वय २३) असे मृत तरुणाचे नाव आहे. संपूर्ण देशभरात मकरसंक्रांतीच्या सणाचा उत्साह असताना नायलॉन मांजामुळे धोत्रे कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.सोनू आज देवळाली गावातून आपल्या बहिणीला घेण्यासाठी पाथर्डी फाटा परिसरातदुचाकीने जात होता. त्यावेळी नायलॉन मांजा त्याच्या गळ्यात अडकून गळा चिरला गेला. गंभीर जखमी अवस्थेत त्याला नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

### दुर्दैवी मृत्यू

संभाजीनगरात एका पोलीस अधिकाऱ्याचा नायलॉन मांजाने गळा कापला आहे. कर्तव्यावर निघालेल्या पीएसआयचा नायलॉन मांजामुळे गळा चिरला. त्यांना तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल केले. बीड बायपास

» पान ३ वर

## » At a Glance

### UGC-NET ची 15 जानेवारीला होणारी परीक्षा रद्द


**सोलापूर :** UGC-NET डिसेंबर 2024



परीक्षा 15 जानेवारी 2025 रोजी होणार होती, पण मकर संक्रांती, पोंगल आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ने ही परीक्षा पुढे ढकलली आहे. नवीन परीक्षा तारीख लवकरच जाहीर केली जाईल. 16 जानेवारी 2025 रोजी होणारी परीक्षा पूर्वीच्या वेळापत्रकानुसार होईल. UGC-NET परीक्षा सहाय्यक प्राध्यापक, पीएच.डी.साठी प्रवेश आणि ज्युनियर रिसर्च फेलोशिपसाठी अनिवार्य आहे.

### सोयाबीन खरेदीसाठी 31 जानेवारीपर्यंत मुदतवाढ


**सोलापूर :** सोयाबीन उत्पादक



शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी महाराष्ट्रातील सोयाबीन खरेदीची मुदत 31 जानेवारीपर्यंत वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. यापूर्वी ही खरेदी 13 जानेवारीपर्यंत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विनंतीवरून हा निर्णय झाला आहे. मुदतवाढीमुळे शेतकऱ्यांना हमीभावात सोयाबीन विक्रीची संधी मिळणार असून, राज्यातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होईल.

### अक्कलकोट येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**अक्कलकोट :** श्री राम मंदिरातील



मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा दिवस दीपोत्सव, महिलांची मोटारसायकल रॅली आणि महाआरती कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. जय श्री राम च्या घोषणा देत महिला, मुले, तरूण, नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमानिमित्त एकत्र आले होते. फत्तेसिंह मैदानावर दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी अयोध्यातील श्री राम मंदिराची प्रतिकृती व जय श्री राम साकारण्यात आले. दिव्याच्या उजेडात फत्तेसिंह मैदान उत्साही वातावरणात न्हाऊन निघाले. यावेळी झालेल्या महाआरतीत महिला, मुली पारंपरिक वेषात सहभागी झाल्या होत्या.

### पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करुन चोरटा पकडला

**सोलापूर :** मागील वर्षभरात



साथीदारांसोबत मंगळवेढा शहर, बठाण, मंद्रूप, मोहोळ, टेंभुर्णी, अक्कलकोट, दोड्याळ, कोंडी, हिरज अशा ठिकाणी घरफोड्या करणाऱ्या अशोक ऊर्फ आशिकाऱ्या छपरू काळे याला सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सिनेस्टाईल पाठलाग करून पकडले. त्याच्याकडून पोलिसांनी एकूण १९ लाख २८ हजार ५०० रुपयांचे जवळपास २८ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत.

# रुक्मिणी मातेला वाणवसा करण्यासाठी पंढरीत महिला भाविकांची गर्दी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : मकरसंक्रांत निमित्त श्री रुक्मिणी मातेला सुवासिनी महिलांनी नवधान्याचे वाण अर्पण करण्यासाठी मंदिरात गर्दी केली. हजारो महिला भाविक पहाटेपासूनच ताटात हळद, कुंकू, तिळगुळ, ऊस, बोर, गाजर, हुरडा यासह अन्य प्रकारचे धान्य अर्पण करण्यासाठी मंदिरात आल्या आहेत. फुलांची सजावट, पुरेशा सोई सुविधा, चांगली स्वच्छता, चांगल्या दर्शन व्यवस्थेने भाविक समाधान व्यक्त करीत आहेत. प्रतिवर्षीप्रमाणे दि 13 ते 15 जानेवारी या कालावधीत भोगी, मकरसंक्रांत व किंक्रांत संपन्न होत आहे.



या सणानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. येणाऱ्या भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी मंदिर समितीकडून भाविकांसाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. तसेच सर्व प्रथा व परंपरेचे पालन करून मंदिरात रंगीबेरंगी फुलांची

» पान ३ वर



### पृथ्वीराज चव्हाण होऊ शकतात काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदाच्या नियुक्तीची चर्चा जोर धरत आहे. त्यांनी तातडीने दिल्लीकडे रवाना होत काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतल्याची माहिती आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, पक्षाच्या हायकमांडने पृथ्वीराज चव्हाण यांच्या नावाला हिरवा कंदील दिला आहे. महाराष्ट्रातील काँग्रेसच्या संघटनेला मजबूत करण्यासाठी ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली जाण्याची शक्यता आहे.

# धुळीमुळे नागरिक,भाविक त्रस्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** - पंढरपूर नगरपरिषदेने प्रदक्षिणा मार्गावर पिण्याच्या पाण्याची नवीन पाईपलाईन टाकण्यास सुरुवात केली आहे. यासाठी रस्ते खोदून पाईपलाईन टाकण्यात येत आहे. रस्ते खोदल्यामुळे धुळीमुळे नागरिक व भाविकांना त्रास होऊ लागला आहे. तरी नगर परिषदेने धूळ उडू नये यासाठी उपाय योजना करावी अशी मागणी होत आहे. पंढरपूर शहरातील प्रदक्षिणा मार्गावरील पिण्याची पाईपलाईन खराब झाली असल्यामुळे नगरपरिषदे वतीने नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यासाठी रस्त्यावर खोदाई करून नवीन पाईपलाईन टाकण्यात येत आहे. पाईपलाईन टाकल्यानंतर रस्ता



बुजविण्यात येत आहे. मात्र रस्त्यावर माती पडली असल्यामुळे धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्याचा त्रास भाविक व नागरिकांना होऊ लागला आहे. धुळीमुळे अनेक नागरिकांना श्वसनाचा त्रास होऊ लागला आहे. उपचारासाठी नागरिक रुग्णालयात दाखल होऊ लागले आहेत. तरी पंढरपूर नगर परिषदेने रस्त्यावर धूळ उडू नये यासाठी उपाय योजना करावी अशी मागणी होत आहे.

# पंतप्रधान मोदी घेणार आज महायुतीच्या आमदाराची बैठक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी आज १५



जानेवारी रोजी मुंबई दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते महायुतीच्या आमदाराची बैठक घेऊन मार्गदर्शन करणार आहेत.या बैठकीत पंतप्रधान मोदी काय बोलणार याकडे लक्ष लागले आहे .

लोकसभा निवडणुकीत महायुतीला म्हणावे तसे यश मिळाले नाही. यानंतर महायुती शासनाने राज्यातील शेतकरी महिला यांच्यासाठी विविध योजना जाहीर केल्या. यातून वोट बँक तयार केली. याचा फायदा विधानसभा निवडणुकीत झाला. विधानसभा निवडणुकीत महायुती मधील भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामधील नेत्यांनी चांगला प्रचार केला. गेल्या अडीच वर्षात शासनाने राबविलेल्या विविध योजनांची माहिती ग्रामीण भागापर्यंत पोहोचविली. या तिन्ही पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जोमाने काम केले. यामुळे विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगले यश मिळाले आहे.

दोन दिवसापूर्वी शिर्डी येथे भाजपची राज्यस्तरीय बैठक घेण्यात आली. या बैठकीस केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अमित शहा यांनी विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगले यश मिळाले आहे.

» पान ३ वर

### पेनुर येथे बैलगाडा शर्यतीचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** पेनूर येथील केसरी बैलगाडा



शर्यतीला राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, मोहोळ माजी आमदार राजन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शर्यतीत बैलजोड्यांचा जोम, स्पर्धकांचा उत्साह आणि प्रेक्षकांची भरघोस उपस्थिती अनुभवून पेनूरच्या एकजुटीची आणि सांस्कृतिक परंपरेची झलक दिसून आली. यावेळी ग्रामस्थ, बैलगाडा प्रेमी, पंच आणि युवा सहकारी उपस्थित होते. बैलगाड्या शर्यतीमध्ये एकूण तीन बक्षीसे ठेवण्यात आली होती. प्रथम, व्दितीय, तृतीय आणि काही उत्तेजनार्थ बक्षीसे ठेवण्यात आली होती. या शर्यतीमध्ये अनेकांनी सहभाग नोंदविला.

## फुलांची आरास...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



» **पंढरपूर** : मकरसंक्रांत सणानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगीबेरंगी फुलांची आरास करण्यात आली होती.

## पंढरपुरातील १८०० विक्रेत्यांना लाभ

# पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर योजना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** कोरोनामध्ये लॉकडाऊन झाले असल्याने सर्व व्यवहार ठप्प होते. यामुळे पथविक्रेते आर्थिक अडचणीत सापडले. त्यांना दिलासा देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर योजना सुरू केली. याचा लाभ पंढरपूर शहरातील 1822 विक्रेत्यांना मिळाला आहे. त्यांना बँकांकडून कोट्यावधी रुपयाचे बिनव्याजी कर्ज वाटप करण्यात आले आहे. या योजनेमुळे पथविक्रेत्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. कोरोनामुळे देशात लॉकडाऊन जाहीर करण्यात आला. यामुळे सर्व व्यवहार ठप्प झाले होते. दुकाने बंद असल्यामुळे सर्वसामान्य गरीब पथविक्रेता आर्थिक अडचणीत सापडला. लॉकडाऊन संपल्यानंतर पुन्हा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांच्याकडे भांडवल नसल्यामुळे अडचण निर्माण झाली. याची दखल




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली. त्यांनी देशातील प्रत्येक महापालिका, नगरपरिषद यांना गावातील पथविक्रेत्यांची यादी तयार करून त्यांना बँकामार्फत बिनव्याजी दहा हजार रुपये देण्याच्या सूचना केल्या. याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात करण्यात आली. पंढरपुरात मुख्याधिकारी प्रशांत जाधव उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर यांच्या मार्गदर्शनाखाली योगेश काळे यांनी पंढरपूर शहरातील पथविक्रेत्यांची यादी तयार करून त्यांना बँकांकडून कर्ज मिळवून दिले. विक्रेत्याने दहा हजार रुपये कर्ज फेडल्यानंतर पुन्हा त्याला वीस हजार रुपये देण्यात आले. याची फेड झाल्यानंतर पुन्हा ५० हजार रुपये रक्कम देण्यात आली. यामुळे पथ विक्रेत्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. पंढरपूर नगर परिषदे वतीने 1254 पथविक्रेत्यांना प्रत्येकी दहा हजार रुपये 426 विक्रेत्यांना प्रत्येकी 20,000 रुपये, 142 विक्रेत्यांना प्रत्येकी 50 हजार रुपये असे 1822 विक्रेत्यांना कोट्यावधी रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनास पथ विक्रेत्यांनी चांगला प्रतिसाद दिला असल्याचे दिसून आले.

### वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** पुणे - हैदराबाद बाह्यवळण



रस्त्यावरील डी मार्टसमोर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने तरुणाचा मृत्यू झाला. शरणबसप्पा भगवंत जमादार ( वय 40, रा. तळे हिप्परगा, ता. उत्तर सोलापूर ) असे मरण पावलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत दौलप्पा भीमशा कोळी ( वय 30, रा. तळे हिप्परगा ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात वाहनचालकाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताबाबतचा अधिक तपास पोलिस करीत असल्याचे सांगण्यात आले.

# २६ जानेवारी पासून काँग्रेस वतीने राज्यभर रॅलीचे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काँग्रेसने जय बापू, जय भीम, जय संविधान रॅलीचे आयोजन केले आहे. 26 जानेवारी पासून ही रॅली राज्यातील विविध जिल्ह्यात जाऊन जनजागृती करणार आहे .



लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. मात्र विधानसभा निवडणुकीत यश मिळाले नाही. यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक डोळ्यासमोर ठेवून काँग्रेसने मतदारांना जोडण्यासाठी रॅलीचे आयोजन केले आहे. जय बापू, जय भीम, जय संविधान रॅली संपूर्ण राज्यभर फिरणार आहे. यातून नागरिकात जनजागृती करण्यात येणार आहे. या रॅलीमध्ये काँग्रेसचे नेते, खासदार, आमदार, पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. 26 जानेवारी पासून रॅलीस सुरुवात होणार आहे.

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेचे माजी महापौर महेश कोठे यांचे आज प्रयागराज येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. यानिमित्ताने काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. महेश कोठे यांनी अनेक वर्षे काँग्रेस पक्षात योगदान दिले होते. राजकारणात मला ही अनेक वेळा त्यांनी सहकार्य केले. एक चांगला मित्र आज आमच्यातून निघून गेला. कोठे कुटुंबीयांच्या कठीण प्रसंगी आम्ही त्यांच्यासोबत आहोत. महेश कोठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

## अ‍ॅड. शिवाजी कांबळे यांचे आवाहन

# आर टी ई कायदा तर्फे मोफत शिक्षण प्रवेश साठी संपर्क करा

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** महाराष्ट्र शासनाने २५% राखीव जागांसाठी आरटीईच्या प्रवेशाला येत्या शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ या वर्षासाठी बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गत दुर्बल व वंचित घटकातील बालकांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा, विनाअनुदानित शाळा, पोलिस कल्याणकारी शाळा आणि महानगरपालिक (स्वयंअर्थसहाय्यित) शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर महाराष्ट्र शासनाने प्रवेशासाठी ऑनलाइन प्रक्रिया मंगळवार दि.१४/०१/२०२५ पासून सुरु केलेली आहे. यासाठी आरटीई कायदयानुसार दुर्बल, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटकातील बालकांना इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर प्रवेशासाठी पालकांनी https://student.maharashtra.gov.in/adm_portal या संकेतस्थळावर अर्ज भरण्याची प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करावयाची आहे. या शाळांमध्ये प्रवेशासाठी बालकांच्या पालकांकडून मंगळवारपासून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यासाठी शेवटची मुदत २७ जानेवारीपर्यंत आहे याची पालकांनी नोंद घ्यावी .

'या' प्रवेशासाठी वंचित घटकांतील बालके,अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ),भटक्या जाती (ब, क, ड),इतर मागासवर्ग (ओबीसी) विशेष मागासवर्ग (एसबीसी) आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटक,एचआयव्ही बाधित किंवा एआयव्ही प्रभावित बालके,अनाथ बालके,दिव्यांग बालके, हे या प्रवेशासाठी अर्ज करू शकतात या संस्थेमार्फत शालेय प्रवेशा संदर्भात मोफत मार्गदर्शन व ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या संदर्भात मोफत सल्ला पण दिला जाणार आहे याचा पालकांनी लाभ घ्यावा.

तरी इच्छुक पालकांनी १) शशिकांत (बापू) कांबळे (संस्थापक,अध्यक्ष) ९८५०५६६००७,२) अ‍ॅड शिवाजी कांबळे (महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष)९९२२२४६१२३ या फोन नंबर वर संपर्क करावा व कागदपत्रांसह समक्ष भेटावे असे जाहीर आवाहन समिती तर्फे करण्यात येत आहे.

## आनंद बाजारात ६० हजाराची उलाढाल

**करमाळा :** करमाळा नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर मुलांची शाळा क्रमांक एक येथे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानासाठी आनंदी बाजारचे आयोजन केले होते. यावेळी ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या बाजारात ६० हजार रुपयांची उलाढाल झाली. प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी यांच्या मार्गदर शनाखाली शुक्रवारी शाळेमध्ये आनंदी बाजार भरवण्यात आला. अभ्यासाबरोबर व्यवहार ज्ञानाची जोड मिळावी, आर्थिक व्यवहार करावेत, कमाईचा आनंद मिळावा हा या उपक्रमा मागचा हेतू होता.

## रेकॉर्डवरील गुन्हेगाराला घरफोडया केल्याप्रकरणी अटक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, मोहोळ, मंद्रूप, अक्कलकोट, टेंभुर्णी व उत्तर सोलापूर तालुक्याच्या हद्दीत 15 घरफोडया केल्याप्रकरणी रेकॉर्डवरील एका गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. तपासात त्याच्याकडून 19 लाख 28 हजार 500 रुपये किमतीचे 28 तोळे सोने हस्तगत केले आहे. अशोक ऊर्फ आशिकाऱ्या छपरू काळे ( वय 35, रा. भंडारकवठे, ता. दक्षिण सोलापूर सध्या रा. नाईकवाडी प्लॉट, मोहोळ ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबतचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## Selected

## ३ गावांना ग्रामपंचायत निवडणुकीचे वेध

**करमाळा :** करमाळा तालुक्यातील २०२४ मध्ये मुदत संपलेल्या तीन गावांना ग्रामपंचायत निवडणुकीचे वेध लागले आहेत. मतदार यादी, आरक्षण सोडत, हरकती अशी सर्व प्रक्रिया पूर्ण झाली. मात्र विधानसभा निवडणुकीमुळे या निवडणुका लांबल्या होत्या. आता या निवडणुका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्यानंतर होणार की आधी होणार याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे. मतदार यादी ही पुन्हा होणार की आहे त्याच यादीवर निवडणूक होणार हे पाहावे लागणार आहे. करमाळा तालुक्यातील भाळवणी, वरकुटे व लव्हे या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे.

## अंत्रोळी गावच्या विकासासाठी नेहमीच कटिबद्ध राहीन



**सोलापूर :** भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख यांनी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अंत्रोळी येथे भेट दिली. यावेळी आमदार देशमुख यांनी सर्व ग्रामस्थांचे आभार मानून त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला. अंत्रोळीची प्रगती करून गावाला समृद्ध करण्यासाठी मी सदैव कार्यरत राहीन. त्याचप्रमाणे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मी नेहमीच कटिबद्ध राहीन असे आश्वासन ग्रामस्थांना दिले. यावेळी संगाप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, यतीन शहा, गौरीशंकर मेंडगुदले, सरपंच माया सलगरे, सोनाली खरात, गाजिनाथ शेजाळ, ब्रह्मदेव सलगरे, अजय कर्वे, अप्पासाहेब सलगरे, आदिनाथ खरात, प्रकाश कोकरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराबाबत आवाहन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** क्रीडा विभागामार्फत शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांमध्ये जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम, दिव्यांग खेळाडू व जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक) असे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. त्यासाठी 26 जानेवारीपूर्वी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. क्रीडा विभागाच्या https: // sports. maharashtra. gov. in या संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

## शासनाच्या नियमांमुळे अनेक शेतकरी वंचित



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायत अशा प्रकारच्या विविध नागरी क्षेत्रापासून जवळ किंवा त्या क्षेत्रात समाविष्ट झालेल्या गावातील मागासवर्गीय शेतकऱ्यांना शासनाच्या नियमांमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजनेतून नवीन विहीर किंवा अन्य कोणत्याही योजनांचा लाभ घेता येणार नाही.

शेतकऱ्यांमध्ये भेद न करता त्यांना शेतीच्या योजनांचा लाभ मिळणे अपेक्षित आहे.

## शुभेच्छा ...!

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सोलापुरातील इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव आणि माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांनी मुंबई येथील देवगिरी या निवासस्थानी मकर संक्रात निमित्त त्यांची भेट घेतली. यावेळी सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वर यांची प्रतिमा, पुष्पगुच्छ, तिळगुळ वड्या देऊन त्यांचा सत्कार करून मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.

## ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू




**सोलापूर :** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून 12 ते 26 जानेवारी 2025 या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37 (1) व 37 (3) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे यास मनाई करण्यात येत आहे.

# माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती व्यापारी वाचनालय येथे साजरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** व्यापारी मोफत वाचनालय मोहोळ येथे स्वामी विवेकानंद व माँसाहेब जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली.*

स्वामी विवेकानंद व माँ साहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहारअर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वाचनालयाचे ग्रंथपाल दिलीप देशपांडे, अंगणवाडी सेविका रजनी गायकवाड, माजी उपसरपंच गौतम क्षीरसागर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक व्ही. जे. कुलकर्णी, युवा नेते अजय कुर्डे, बागवान, पवार सर, शहाजहान बागदान, अभिजीत गवळी, अविनाश वाघमारे, सुभाष मोहोळकर व बालकलाकार राजवर्धनी घाडगेविधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य तथा पी.एल. व्ही. राजन घाडगे आदि. मान्यवर उपस्थित होते.

प्रसंगी अंगणवाडी सेविका रजनी गायकवाड यांनी मासाहेब जिजाऊ यांच्या बद्दल माहिती दिली तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर चार च्या बाल कलाकार आज वर्धनी घाडगे हिने मी जिजाऊ बोलते हे एक पात्री नाटक सादर केले. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण अंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य राजन घाडगे यांनी लीगल सर्विस युनिट फॉर चिल्ड्रन या विषयासंबंधी माहिती दिली. नालसाच्या फलकाचे अनावरण ग्रंथपाल दिलीप देशपांडे यांच्या शुभहस्ते केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ सुधीर जोशी यांनी केले तर शेवटी आभार शहाजान बागवान यांनी मांडले .

## सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेची कार्यकारीणी जाहीर



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या मोहोळ तालुका अध्यक्षपदी जयंत कुलकर्णी यांची तर सचिव म्हणून प्रवीण जगताप यांची निवड करण्यात आली.

जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या मोहोळ तालुका कार्यकारणीच्या निवडीसाठी बैठक घेण्यात आली . अध्यक्षस्थानी सावळेश्वर मंडळाधिकारी प्रकाश दळवे होते .यावेळी खालील प्रमाणे कार्यकारणी निवड करण्यात आली. ती अशी- अध्यक्ष -जयंत कुलकर्णी, उपाध्यक्ष - अजीज आवटे कार्याध्यक्ष- श्रीमती बी. एच. फुलारी,कोषाध्यक्ष- गणेश सगेल, सचिव- प्रवीण जगताप ,संघटक- अजित वाघमोडे, महिला प्रतिनिधी - श्रीमती व्ही. आर.अधटराव, सारिका नवले, वनिता सुरवसे,सल्लागार जे.एफ. नदाफ, आणि बाबा कांबळे.

प्रकाश दळवे बसवराज सालीमठ आणि एम एस लोंढे हे मार्गदर्शक म्हणून काम करणार आहेत. यावेळी टी. डी. अडगळे, रमेश कारंडे, आशिष यादव, संगीता अष्टूळ,शहीदा नाईकवाडी आदि महसूल कर्मचारी निवडीनंतर सर्वांचे पुष्पगुच्छ आणि शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## भूमिहीन, शेतमजूरांना मिळणार जमीन



**सोलापूर :** कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील भूमिहिन शेतमजूर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना 2 एकर बागायत किंवा 4 एकर जिराईत जमीन 100 टक्के अनुदान स्वरुपात खरेदी करुन देण्यात येत असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसुचित जातीचा दारिद्र्य रेषेखालील व कुटुंब प्रमुखाचे वय 60 वर्षापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. 60 वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या कुटुंबा प्रमुखाच्या पत्नीला या योजनेचा लाभ घेता येईल.




गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा

आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

## क्रांतिवीर भगतसिंग कराटे अकॅडमीचे कार्य कौतुकास्पद

# कोरोना काळापासून मुलांच्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात बदल-परिचारक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** कोरोना काळापासून मुलांच्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. कुटुंबातील सदस्यांबरोबरच संवाद कमी होऊन, खेळाच्या मैदानावरील आवड कमी होऊन मोबाईलशी त्यांचे नाते घट्ट होत आहे. जागरूक पालकांनी याबाबतचा विचार करून आपल्या मुलांना मैदानावरील खेळांकडे नेण्याचा प्रयत्न करावा असे सांगत मोहोळ सारख्या ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात क्रांतिवीर भगतसिंग कराटे अकॅडमीच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरापर्यंत मुले पोहोचत आहेत ही अभिमानाची गोष्ट असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रेल्वे समितीचे सदस्य अ‍ॅड. प्रणव परिचारक यांनी केले.



क्रांतिवीर भगतसिंग कराटे अँन्ड स्पोर्ट्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीयस्तरावर मिळवलेल्या दैदिप्यमान यशाबद्दल त्यांचा सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रणव परिचारक बोलत होते. व्यासपीठावर सहा. पोलीस निरीक्षक किरण पाटील, सामाजिक कार्यकर्ते अनंत नागणकेरी, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष संजय आठवले, कार्यक्रमाचे संयोजक व प्रशिक्षक दशरथ काळे, पत्रकार भारत नाईक, रणजीत भोसले, सोलापूर जिल्हा खो-खो असोसिएशनचे संतोष कदम, मंगेश पांढरे, माजी प्राचार्य श्रीधर उन्हाळे, विष्णु शिंदे, न्यूज चैनल चे पत्रकार अशोक कांबळे, दिनेश सातपुते,अक्षय वाडकर, विजय नागमोडे, कराटे प्रशिक्षक दिलीप शिंदे, नितीन बारसकर, सुनील गायकवाड आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात दशरथ काळे म्हणाले, मुलांच्या मानसिक विकासाबरोबरच त्यांचा शारीरिक विकास होणे अत्यंत गरजेचे असून मुलांना मैदानी खेळांची सवय लावण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. क्रांतिवीर भगतसिंग अकॅडमी ने विद्यार्थ्यांना सर्व गुण संपन्न होण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन केल्यामुळेच राष्ट्रीय स्तरापर्यंत मोहोळ शहरातील मुलांनी चमकदार कामगिरी केली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रमोद कोरे यांनी केले तर आभार नितीन बारसकर यांनी मानले. यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील कराटे स्पर्धेमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

पंढरी संचार

**पंढरपूर :** एका सात वर्षाच्या अल्पवयीन मुलीला तिचे पालन पोषण न करण्याच्या उद्देशाने तिला तिच्या पालकांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर पंढरपूर येथील नामदेव पायरीसमोर सोडून गेले. मंदिर सुरक्षा कर्मचारी श्रीधर अशोक कुलकर्णी यांना विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथील नामदेव पायरीसमोर एक अनोळखी मुलगी वय अंदाजे ७ वर्षे ही मिळून आल्याने त्यांनी तिला पंढरपूर शहर पोलिस स्टेशन येथे हजर केले होते. पोलिसांनी मंदिर परिसरात त्या बालिकेच्या विचारपूस केली.

## स्वेरीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम सुरु

# अभियांत्रिकी, फार्मसी ग्रंथालयात होतेय नियमित वाचन

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** स्वेरीच्या इंजिनिअरिंग व फार्मसी मध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविला जात आहे या प्रसंगी दोन्ही महाविद्यालयातील वाचन करत असतानाचे छायाचित्र.

**पंढरपूर :** अलीकडील 'सोशल मीडिया' मुळे सध्याची तरुणाई 'वाचन संस्कृती' कडे दुर्लक्ष करीत असल्याचे जाणवत आहे त्यामुळे भविष्यकाळ अंधारमय होण्याची चिन्हे दिसत असल्याने महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या वतीने दि. ०१ जानेवारी ते दि. १५ जानेवारी २०२५ या पंधरवड्यामध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राज्यभरातील महाविद्यालये, विद्यापीठे, सार्वजनिक वाचनालये या ठिकाणी राबवण्याचे अधिकृत परिपत्रक काढण्यात आले आहे. त्यानुसार राज्यभर पुन्हा तरुण वर्ग वाचनाकडे वळल्याचे दिसून येत आहे. शासनाच्या आदेशाने व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या सूचनेनुसार गोपाळपूर (ता. पंढरपूर) मधील स्वेरी अंतर्गत असलेल्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस), कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या पदवी, पदविका महाविद्यालयांमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम उत्साहाने राबविण्यात येत आहे.

'वाचन संस्कृती' मुळे तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वांगीण प्रगती होते. सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते परंतु अलीकडच्या काळात देशाचा तरुण 'वाचन संस्कृती'पासून अलिप्त होत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये 'वाचन संस्कृती' वाढवण्यासाठी हा उदात्त उपक्रम राबवण्याचा संकल्प शासनाने केला. विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये यांमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाचे स्वेरीत स्वागत करण्यात आले. दि.१ जानेवारी २०२५ रोजी स्वेरी महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील मराठी विषयाचे विभागप्रमुख डॉ. रमेश शिंदे यांच्या हस्ते 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाचे उदघाटन करण्यात आले. त्यांनी वाचनाचे फायदे व सध्या वाचन संस्कृती राबविणे का गरजेचे आहे, हे पटवून दिले. हा उपक्रम दि. १५ जानेवारी पर्यंत राबविण्यात येणार आहे. यामध्ये स्वेरी अंतर्गत असलेल्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या पदवी, पदविका महाविद्यालये, ग्रंथालये, तसेच वसतिगृहांमध्ये 'नाईट स्टडी'च्या माध्यमातून विद्यार्थी वाचन करत आहेत. शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाचा विद्यार्थ्यांना फायदा होत आहे.

संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, कॅम्पसचे इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम.एस.मठपती, दोन्ही महाविद्यालयांतील विभागांचे प्रमुख, वर्गशिक्षक, ग्रंथालय प्रमुख सतीश बागल, बी. फार्मसी ग्रंथालय प्रमुख धनाजी पोरे तसेच ग्रंथालयातील कर्मचारी अमोल रोंगे, सतीश अनपट व इतर कर्मचारी हे या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत. या उपक्रमासाठी समन्वयक म्हणून प्रा.सुजित इनामदार हे काम पहात आहेत. या संपूर्ण पंधरवड्यामध्ये चारही महाविद्यालयात, ग्रंथालयात विद्यार्थी हे उत्स्फूर्तपणे वाचन करत असल्याचे दिसून येत आहे.

## सोलापूरचे माजी महापौर महेश कोठे यांचे निधन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व सोलापूर शहराचे माजी महापौर महेश कोठे यांचे आज हृदयविकाराने येथे निधन झाले. ते कुंभमेळ्यानिमित्त प्रयागराज येथे गेले होते. पहाटेच्या थंडीत शाही स्नान केल्यानंतर ते नदीतून बाहेर आले. त्यावेळी त्यांना थंडीचा कडाका जाणवू लागला. त्यानंतर त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांचा मृत्यू झाला होता. त्यांचे पार्थिव विमानाने सोलापुरात आणले जाणार आहे. त्यांनी नुकतीच विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यात त्यांचा पराभव झाला होता.

» पान १ वरुन

## वाल्मिक कराडवर ...

उपस्थित असलेल्यांनी या तरुणीला रोखले. यावेळी या तरुणीसह इतरांनी वाल्मिक कराडच्या बाजूने घोषणाबाजी केली.

वाल्मिक कराडने आत्मसमर्पण केल्यानंतर त्याला न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. आज ती कोठडी संपणार असल्याने या प्रकरणी बीड जिल्ह्यातील केज न्यायालयात सुनावणी होती. यावेळी न्यायालयाने कराडला न्यायालयीन कोठडी सुनावली असून, त्याच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती यावेळी न्यायालयाने फेटाळून लावली.

## मांज्याचा बळी!

परिसरातील सुधाकरनगर मध्ये सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेत पीएसआय गंभीर जखमी झाले आहे. सचिन पारधे असे जखमी पीएसआयचे नाव असून ते स्थानिक गुन्हे शाखेत अधिकारी आहेत. मंगळवारी सकाळी दहा वाजता ते नेहमीप्रमाणे कर्तव्यावर दुचाकीने निघाले असता ही घटना घडली.

भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथील उड्डाणपुलावर एका २४ वर्षीय तरुणाचा नायलॉन मांजाने गळा कापला. तरुण भंडाराकडून गोंदियाच्या दिशेने दुचाकीने जात होता. शुभम जियालाल चौधरी (रा. गोरेगाव, जि. गोंदिया) असे जखमी तरुणाचे नाव आहे. शुभम भंडाराकडून गोंदियाकडे जात असताना लाखनी उड्डाणपुलावर कटलेला पतंगाचा मांजा गळ्यात अडकल्याने गळा कापला गेला. यात तरुण गंभीर जखमी झाला. स्थानिकांनी प्राथमिक उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर त्याला भंडाराच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## रुक्मिणी मातेला वाणवसा करण्यासाठी....

आरास करण्यात आली असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

मकरसंक्रांती सणानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात रंगीबेरंगी फुलांची आरास करण्यात आली आहे. त्यामध्ये गाभारा, चारखांबी, नामदेव पायरी येथील भाग सजावटीने आकर्षक व मनमोहक दिसत आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच महिला भाविकांनी मंदिरात गर्दी केली आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना जलद व सुलभ दर्शन सोयी सुविधांचे नियोजन मंदिर समितीसह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य संभाजी शिंदे व ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. भाविकांची गर्दी विचारात घेऊन, सुलभ व जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने ऑनलाइन दर्शन पास बुकिंग व्यवस्था बंद ठेवण्यात आली आहे. तसेच थेट दर्शनावर निर्बंध, पुजेची संख्या कमी करणे, महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

मकरसंक्रांत निमित्त श्री रूक्मिणी मातेला पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले. त्यामध्ये सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, जवेच्या माळा, तांबडी चिंचपेटी, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, जवमणी पदक, हायकोल, सरी, कंबरकट्टा, लक्ष्मीहार इत्यादी अलंकाराचा समावेश आहे.

## पंतप्रधान मोदी घेणार आज....

यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत पुन्हा यश मिळविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कामाला लागावे अशा सूचना केल्या. यामुळे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना ऊर्जा मिळाली आहे .

१५ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबई दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते महायुती मधील भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या आमदाराची बैठक घेणार आहेत. या बैठकीत मोदी मार्गदर्शन करणार आहेत. मोदी कोणते मार्गदर्शन करणार याकडे आमदारांचे लक्ष लागले आहे.

## खासदार प्रणिती शिंदे यांची सरकारवर टीका



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** बीड आणि परभणी सारख्या मोठ्या गंभीर स्वरूपाच्या घटना घडूनदेखील राज्य सरकार गंभीर नसल्याची प्रतिक्रिया सोलापूर लोकसभा मतदार संघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी आज दिली आहे. शिंदे या सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धेश्वर यात्रेच्या अक्षता सोहळ्यासाठी सिद्धेश्वर मंदिर परिसरात आल्या होत्या. त्यावेळी पत्रकारांनी त्यांना विविध मुद्द्यांवर बोलते केले त्यावेळी त्या बोलत होत्या.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**माळशिरस :** सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य या संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबीरास माजी आ. राम सातपुते यांनी भेट दिली असता संस्थेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

## Selected

## ट्रॉफीवर बार्शी संघाचा कब्जा

**सोलापूर :** एसपी चषक २०२५ अंतर्गत आयोजित शहीद अशोक कामटे सर ट्रॉफी स्पर्धेत पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले, तर बार्शी उपविभाग संघाने उल्लेखनीय कामगिरी करत उपविजेतेपद मिळवले. सदरच्या स्पर्धेकरिता प्रत्येक उपविभागातील एक संघ होता. अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या संघाने बार्शी उपविभाग संघावर विजय मिळवत प्रतिष्ठेची शहीद अशोक कामटे सर ट्रॉफी आपल्या नावावर केली.

## प्रमोद गायकवाड हा सोलापूरचा वाल्मीक कराड



**सोलापूर :** बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरण सर्वत्र गाजत आहे. बीडच्या सरपंचाची हत्या प्रकरण ताजं असताना सोलापूरमध्येही एका तरुणाची हत्या झाल्याची घटना घडली आहे. या हत्येच्या विरोधात स्थानिक नागरिकांनी कॅन्डल मार्च काढत संताप व्यक्त केला. या हत्याकांडातील आरोपी प्रमोद गायकवाड हा सोलापूरचा वाल्मीकी कराड असून त्याची शरद पवार गटातून हाकलपट्टी करा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली.

# सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य या संस्थेने राबविलेले रक्तदान शिबीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** आपण समाजाला काहीतरी देणं लागतो या कल्पनेने सुरू झालेली संस्था म्हणजे एक हात मदतीचा सामाजिक संस्था. सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य या संस्थेचा मोठा उपक्रम म्हणून या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलं होतं. स्त्री जन्माचे स्वागत या शिबिराचं मुख्य कारण होतं. संस्थेतील एका सदस्याच्या घरी मुलगी जन्माला आली म्हणून संस्थेने त्या संदर्भाने रक्तदान शिबिर आयोजित केलं आणि या रक्तदान शिबिराला माळशिरस शहरातील तरुण वर्गाने भरभरून प्रतिसाद दिला . रक्तदान करणाऱ्यांची संख्या अविश्वसनीय होती. दिवसभरात तब्बल 134 रक्तदात्यांनी रक्तदान केले आणि उपक्रमाची शोभा वाढवली. या रक्तदानाचे उद्घाटन माळशिरस येथील समीर गांधी कला महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय श्री. डॉ. देविदास गेजगे सर यांनी केले. तसेच या कार्यक्रमासाठी माळशिरस तालुक्याचे माजी आमदार मा.श्री रामभाऊ सातपुते यांनी सदिच्छा भेट दिली आणि संस्थेला खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर मा श्री जीवन दादा उत्तमराव जानकर यांनीही सदिच्छा भेट दिली. आणि संस्थेला खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या. तसेच माळशिरस मधील बऱ्याच प्रतिष्ठित व्यक्तींनी या उपक्रमाला उपस्थिती दर्शविली आणि शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी संस्थेतील सर्व सभासदांनी खूप मोलाचे सहकार्य केलं. या कार्यक्रमाच्या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय श्री नागेश जाधव ,उपाध्यक्ष जुमेखान मुजावर, सचिव श्री भाग्यवंत भालेराव ,खजिनदार समाधान कसबे ,तसेच संस्थेचे सदस्य वैभव मस्के, अजय भांडेकर, केशव मेहेर, विशाल कांबळे, अजित येडगे, भूषण वाघमोडे, आदी उपस्थित होते.

### अडीच लाखांची फसवणूक

**सोलापूर :** मालट्रकवर चालक म्हणून ठेवलेल्यानेच गाडीचे टायर, डिझेल विकून व खर्चाला दिलेले पैसे अशी एकूण दोन लाख ५० हजारांची फसवणूक केल्याची घटना पोफळी (ता. मोहोळ) येथे घडली. चालक नितीन अनिल कानडे याच्या विरोधात तब्बल वर्षाने मोहोळ पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. तानाजी दत्तू यजगर (वय ३७, रा. पोफळी) यांनी त्यांचे मेहुणे महावीर संभाजी बंडगर यांच्या नावावर असलेली बारा टायरचा मालट्रक (एमएच १३ एएक्स २४८९) चालविण्यासाठी नोटरी करून घेतली होती. त्यावर चालक म्हणून नितीन कानडे (रा. वनसळ, ता. उ. सोलापूर) हा कार्यरत होता.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठचे नामविस्तार दिना निमित्त कार्यक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** येथील पंचशील परिवाराच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठचे नामविस्तार दिना निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. नालंदा वाचनालय मोहोळ येथे शहीदाना विनम्र अभिवादन करण्यासाठी दलित पँथरचे जेष्ठ नेते व नियोजित लुबीनी बुद्ध विहाराचे अध्यक्ष कुमार ढवळे, मंडळांचे सचिव धनंजय जगताप, पत्रकार व बुद्ध विहाराचे सचिव व संचालक धनंजय आवारे, बी.वाय.रोडे, भानवसे, इंजि विशाल रोडे व इंजि शशिकांत ठोकळे हे उपस्थितीत होते.

याप्रसंगी आयु धनंजय आवारे यांनी नामविस्ताराची माहिती दिली. तसेच डॉ बाबासाहेब यांनी शिक्षणाला जसे महत्त्व दिले. तसेच मोहोळ येथील पंचशील मित्र मंडळाने त्याचा एक भाग म्हणून नालंदा वाचनालय मोहोळ उभे केले. यात एक जरी विद्यार्थी अभ्यासास आला तरी 100 विद्यार्थी अभ्यास केल्यासारखे आहे असे मत व्यक्त केले

आयु. कुमार ढवळे यांनी या अंदोलनात 1978 ते 14 जानेवारी 1994 पर्यंतचा संपूर्ण इतिहास सांगताना. आपल्या वर कसा अन्याय अत्याचार केला. याचे पोचीराम यांचे वरील अमानुष अत्याचार सवर्ण समाजातील जनतेने कसा केला, यात ढोले, कवाडे रामदास आठवले ज. वी पवार, गंगाधर गाडे असे साहित्यिकांनी समाजाला योग्य दिशा देऊन आपली मागणी मंजूर करून घेतली. याचा लेखा जोखा उलघडला. इंजि शशिकांत ठोकळे यांनी आभार प्रदर्शन करताना सांगितले की, असे कार्यक्रम आयोजित करून तरूण पिढीला आपला इतिहास काय आहे व या पासून आंबेडकर चळवळ कशी पुढे घेऊन जाता येईल. यासाठी कार्यक्रमाला कितीजण आहेत पेक्षा हाडाचे व बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या अनुयायांच्या उपस्थितीत भविष्यात असे कार्यक्रम होणे महत्वाचे आहे मत व्यक्त करीत सर्वांचे आभार मानले.




## यावर्षी प्रथमच मिळणार दिवाळीची सुट्टी

# जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी केल्या सुट्टया जाहीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी त्यांच्या अधिकारात येत असलेल्या तीन स्थानीक शासकीय सुट्ट्या सोलापूर शहर व जिल्ह्यासाठी परिपत्रकाव्दारे जाहीर केल्या आहेत.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढलेल्या परिपत्रकात म्हटले आहे की शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग सावेसू/स्था 1983/ 1781 (64)/83 29, 14 जून 1983 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून सोलापूर शहर व जिल्ह्यात सन 2025 या वर्षासाठी सोलापूर जिल्ह्यातील सर्व शासकीय तीन स्थानिक शासकीय सुट्ट्या जाहीर केल्या आहेत.




जाहीर केलेल्या सुट्ट्या पुढील प्रमाणे- मकर संक्रांत मंगळवार -14 जानेवारी 2025, घटस्थापना सोमवार - 22 सप्टेंबर 2025, सोमवार - नरक चतुर्दशी 20 ऑक्टोबर 2025.

या तीनही दिवशी सोलापूर जिल्ह्यात शासकीय सुट्ट्या असणार आहे.

या दिवशी सोलापूर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालय बंद राहणार आहेत. तसेच स्थानिक सुट्ट्यांचे दिवशी शासकीय कोषागार कार्यालयही बंद ठेवण्यात येणार आहे. या जाहीर केलेल्या तीन सुट्ट्यासंदर्भात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्यातील महसूल विभाग अंतर्गत येणाऱ्या सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व शाखाप्रमुखांना व जिल्ह्यातील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालय प्रमुखांना तसेच सर्व वरिष्ठ कार्यालयांना परिपत्रकाव्दारे कळवण्यात आले आहे.

सप्टेंबर 2025 मधील घटस्थापनेच्या सुट्टी सोमवारी असल्यामुळे शनिवार, रविवार व सोमवार असे सलग तीन दिवस सुट्टी असणार आहे. तर ऑक्टोबर 2025 मधील सुट्टीही सोमवारी येत असल्यामुळे शनिवार, रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार व गुरुवार पर्यंत असे एकूण ६ दिवस दिपावलीचा सुट्टीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे 2025 मधील सणासुदीला शासकीस आधिकारी व कर्मचाऱ्यांना कुटुंबासमवेत सण साजरा करण्यास मिळणार आहे.

संपादकीय विशेष

# प्रवास सुकर करणारे नवतंत्रज्ञान

प्राज इंडस्ट्री' या संस्थेच्या माध्यमातून अलिकडेच धान, मका आणि ऊस आदींच्या टाकाऊ घटकांपासून सरकारसाठी गुळगुळीत रस्ता बनवला गेला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून असा रस्ता साकार झाला. नागपूर जिल्ह्यातील मानसरजवळ बांधण्यात आलेला भारतातील हा पहिला बायो-बिटुमेन निर्मित रस्ता आहे. नागपूर-मानसर बाह्यवळण प्रकल्पात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 44 या ठिकाणी बायो-बिटुमेनचा वापर करून महामार्ग बांधण्यात आला आहे. हा रस्ता वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद, केंद्रीय रस्ते संशोधन संस्था, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि प्राज इंडस्ट्रीज यांनी संयुक्तपणे तयार केला आहे. प्राज इंडस्ट्रीजने स्वतः लिग्निनवर आधारित तंत्रज्ञानापासून बायो-बिटुमेन तयार केले आहे. लिग्निन (लाकडाचा एक घटक) हा घटक एक प्रकारच्या जटिल पॉलिमर (फायबर) वनस्पतीमध्ये आढळतो. प्राज इंडस्ट्रीजच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या या तंत्रज्ञानामध्ये कच्च्या लिग्निनचे बायो-बिटुमेनमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. यामुळे जीवाश्म-आधारित बिटुमेनच्या जागी संस्थेने नवा हरित पर्याय उपलब्ध करून दिला आहे. जीवाश्म-आधारित बिटुमेनमध्ये 15 टक्क्यांपर्यंत बायो-बिटुमेन मिसळून वापरता येते, असे याबाबत म्हटले आहे.

बिटुमेन हे तेल उत्पादनाचे उपउत्पादन आहे. ते पक्क्या रस्त्यांच्या बांधणीसाठी वापरले जाऊ शकते. हे बिटुमेन म्हणजे कच्च्या तेलाच्या विभाजनामुळे तयार होणारे हायड्रोकार्बनचे काळे चिकट मिश्रण आहे. रस्ते बांधणीत ते सर्व घटकांना एकत्रित बांधण्याचे कार्य करते. कच्च्या तेलाच्या ऊर्ध्वपतनातून तयार होणारा हा काळा पदार्थ डांबरासारखाच पण त्यापेक्षा थोडा निराळा आहे. त्याचा वापर रस्ते बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. बायोबिटुमेन हे जैव-आधारित बंधक (बाइंडर) आहे. भाजीपाला, झाडाचे खोड, शेवाळ, लिग्निन किंवा प्राण्यांची विष्ठा यासारख्या अक्षय स्रोतांपासून ते बनवण्यात येते. लिग्निन हे वनस्पती आणि झाडांमध्ये आढळणारे एक स्ट्रक्चरल पॉलिमर आहे, जे अनेक औद्योगिक प्रक्रियांमध्ये टाकाऊ म्हणून सोडले जाते. पेट्रोलियम-बिटुमेनला स्थानिक पर्याय म्हणून हे बायोबिटुमेन विकसित करण्यात आले आहे. रस्त्यांच्या बांधकामात याचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी होणार आहे. पोर्तुगालमधील मिन्हो विद्यापीठातील 'सेंटर फॉर टेरिटरी, एन्व्हायर्नमेंट अँड कन्स्ट्रक्शन'चे ह्यूगो सिल्वा हे युनिट बायोबिटुमेनवर संशोधन करत आहेत. त्यांच्या मते पारंपरिक बिटुमेनप्रमाणेच जैव-आधारित आणि प्लास्टिक पॉलिमर बायोबिटुमेन अधिक विकसित करण्यासाठी मिश्रणात मिसळले जाऊ शकतात. पॉलिमरमुळे कार्यक्षमतेत सुधारणा होऊ शकते. बायोबिटुमेन पर्यावरणासाठी डांबरापेक्षा अधिक अनुकूल आहे.

बिटुमेन रस्त्यांचे अनेक फायदे आहेत. बिटुमेनचे वॉटरप्रूफिंग आणि बंधक गुणधर्म रस्ते दीर्घकाळ टिकणारे बनवतात. बिटुमेन रस्त्यांचे पृष्ठभाग तुलनेने अधिक गुळगुळीत असतात. बिटुमेन रस्ते पाणी आणि कोणत्याही प्रकारच्या अत्यंत तीव्र हवामानास प्रतिरोधक असतात; तसेच काँक्रीट रस्त्यांपेक्षा कमी खर्चात लवकर बांधले किंवा दुरुस्त केले जाऊ शकतात. यूकेमधील अस्टन युनिव्हार्सिटीमधले बायोएनर्जीतज्ज्ञ युकिंग झांग म्हणतात की भविष्यात अक्षय आणि नवीकरणीय उर्जेचा वापर वाढून पेट्रोलियम पदार्थांचा वापर कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आम्ही कचरा आणि बायोमासचा वापर करून रस्ते अधिक हिरवे आणि पर्यावरणपूर्वक बनवण्याचा प्रयत्न करत आहोत. नेदरलँड्समध्येदेखील जैवआधारित रस्ते आणि सायकल मार्ग आहेत. ते नैसर्गिक बाईंडर लिग्निनपासून बनवलेल्या बिटुमेनसदृश्य पदार्थाने पक्के केलेले आहेत. यात कार आणि अवजड ट्रक यांच्यासाठी बनवलेल्या रस्त्याचा काही भाग समाविष्ट आहे.

सेंट्रल रोड रिसर्च इन्स्टिट्यूटमधील तज्ज्ञ सांगतात की, शहरातून निघणारा कचरा, टाकाऊ प्लास्टिक यांचाही वापर रस्तेबांधणीत केला जातो. शहरातून निघालेला कचरा एका ठिकाणी गोळा केल्यावर वर्गीकरण केले जाते. त्यातून जैव अपघटन (बायोडिग्रेडेशन) होणारे आणि न होणारे प्लास्टिक वेगळे केले जाते. यंत्राद्वारे त्याचे तुकडे केले जातात. ते खडी/गिट्टीत मिसळून 150 डिग्री सेल्सियस तापमानावर ठेवले जाते. या प्रक्रियेमुळे गिट्टीला प्लास्टिकचे आवरण चढते. त्यात बिटुमेन टाकून रस्त्यावर अंथरले जाते. या मिश्रणामुळे वाढते तापमान, पाऊस आणि अधिक भारवहनाचा परिणाम या रस्त्यावर होत नाही. या तयार रस्त्याचे दोन वर्ष आणि तीन पावसाळी हंगामांमध्ये निरीक्षण करण्यात आले. यातून समाधानकारक असे निष्कर्ष पुढे आले.

आपल्या देशाला सध्या रस्ते बांधणीसाठी 40 लाख टन डांबर लागते. त्यातील 45 हजार टन डांबर रिफायनरीमधून येते. केंद्र सरकारने रस्ते बांधणीसाठी पेट्रोलियम-आधारित बिटुमेनमध्ये 35 टक्क्यांपर्यंत लिग्निन मिसळण्यास परवानगी दिली आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या अधिकृत आकडेवारीनुसार 2023-24 मध्ये देशाचा बिटुमेनचा वापर 88 लाख टन होता. चालू आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये तो 100 लाख टनांवर जाऊ शकेल, असा अंदाज आहे. यातील 50 टक्के बिटुमेन आयात केले जाते. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या 45 हजार टनासाठी देशाला वार्षिक 25 ते 30 हजार कोटी रुपयांचा आयात खर्च येतो. बायो-बिटुमेनचा उपयोग केल्यास रस्ते निर्मितीची किंमत कमी होऊन मोठा फायदा होऊ शकतो. नागपूर जिल्ह्यात मानसरच्या भागात धानाची शेती मोठ्या प्रमाणात होते. धान काढल्यानंतर जमिनीत उरणारे तण, पराळी (राइस स्ट्रॉ) जाळण्याऐवजी त्यापासून अन्य पदार्थ तयार करण्याचे तंत्रज्ञान देशात तयार झाले आहे. देशात जैव कचऱ्यापासून सीएनजी बनवण्याचे 400 प्रकल्प सुरू आहेत. यापैकी 40 पूर्ण झाले असून त्यात परालीपासून सीएनजी तयार करण्यात येते आहे. या उपक्रमामुळे जैव-रिफायनरीजसाठी महसूल निर्माण होण्यासही मदत होईल. पारंपरिक डांबराच्या तुलनेत हरितगृह वायू उत्सर्जन 70 टक्क्यांपर्यंत कमी होईल. या प्रकल्पांमध्ये एकूण 60 लाख टन पराली वापरण्यात आली आहे. भारतात भाताच्या पेंढ्यापासूनही सीएनजी बनवले जात आहे. पेट्रोलपेक्षा सीएनजी स्वस्त आहे. यामुळे प्रदूषणही कमी होते आणि पैशांचीही बचत होते. शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. कचऱ्याला पैसे मिळू शकतात, हा विचार शेतकऱ्यांमध्ये हळूहळू रुजू लागला आहे. यामुळे शेतकरी अन्नदाता आणि ऊर्जादाता बनण्याबरोबरच बिटुमेनदातेही बनतील

# आग सोमेश्वरी असली तरी...

**अमेरिकेतील एक भाग वणव्याच्या भीषण झळांमध्ये होरपळत असल्याच्या पार्श्वभूमीवर जगभर 'फॉरेस्ट फायर'ची चर्चा आहे. मात्र इतक्या प्रचंड अग्निकुंडातही झालेली कमी जीवितहानी, घर सोडणाऱ्यांना विम्याच्या संरक्षणामुळे न जाणवणारी अर्थहानी, स्थलांतरितांना मिळणारे संरक्षण हे सगळे लक्षात घेता आपण बरेच काही शिकायला हवे असे वाटते. ते जमले तर नैसर्गिक आपत्ती हाताळण्याची आपली क्षमताही वाढू शकेल**

अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथील जंगलांना लागलेल्या वणव्यांची चर्चा करताना मोठ्या प्रमाणावर नष्ट झालेली जनसंपदा आणि वन्यजीव गमावण्याचा मुद्दा महत्त्वपूर्ण आहेच, मात्र आगीची तीव्रता प्रचंड असतानाही त्यामानाने मनुष्यहानी अत्यंत कमी झाली असल्याची बाबही लक्षात घेण्याजोगी आहे. खेरीज या आपत्तीमध्ये तेथील नागरिकांना केवळ सरकारकडून मदत मिळाली नाही तर संपूर्ण समाज मदतीसाठी पुढे आला. त्यांच्या बचावासाठी कॅनडाचे फायर फायटर प्लेन दाखल झाले. एकंदरीतच या दुर्घटनेतून भारताने अनेक गोष्टी शिकण्याची गरज आहे, असे म्हणावे लागेल.

जंगलामध्ये आगी भडकलेल्या कॅलिफोर्निया भागाचा विचार केला तर हे पूर्ण क्षेत्र घनदाट जंगलाने व्यापलेले आहे, असे दिसते. मात्र त्यात गॅस वा वीज वाहून नेणाऱ्या तारांचे मोठे जाळेही पसरले आहे. अर्थातच जंगल घनदाट असल्यामुळे त्यांची आवश्यक तेवढी देखभाल होत नाही. दुसरीकडे, वातावरणातील बदल आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे या भागातील ड्राय सिझन वाढला आहे. ही स्थिती पुढील दोन महिन्यांपर्यंत राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अर्थातच पाऊस कमी आणि उष्णता जास्त, अशा परिस्थितीत तेथे दुष्काळसदृश स्थिती अनुभवास मिळते आहे. अशा काळात वारे वेगाने वाहतात आणि बाष्पाचे प्रमाण नसल्यामुळे जंगलांना आग लागण्याची शक्यताही वाढते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे अशा आगींमध्ये वन्य जीवांचे मोठे नुकसान होतेच, खेरीज संपूर्ण परिसंस्थाच बाधित होते. वृक्षवाढ, जमिनीची धूप, पाण्याची शुद्धता अशा एक ना अनेक बाबींवर त्याचा विपरीत परिणाम होतो. ताज्या घटनेचा विचार केला तर अग्निशामक यंत्रणेकडील पाण्याची कमतरता हे आग भडकण्यामागील मुख्य कारण होते. हे लक्षात घेता डोनाल्ड ट्रम्प यांनी हा विषय चर्चेत आणत प्रशासनाला प्रश्न विचारला. दुष्काळाची स्थिती बघता जंगलांना आग लागण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने त्या नियंत्रित आणण्यासाठी फायर डिपार्टमेंटचे बजेट वाढवणे गरजेचे होते, असे ते म्हणाले. पुरेसे पाणी मिळाले असते तर आग लवकर आटोक्यात आणता आली असती, हा त्यांच्या विधानांचा मतितार्थ होता. त्यामुळे अमेरिकेसारख्या देशामध्येही पाण्याअभावी अशा दुर्घटना घडतात, हे आपण समजून घ्यायला हवे.

याच भागामध्ये हॉलीवूडच्या प्रसिद्ध तारे-तारकांचे प्रशस्त बंगले आहेत. हा भाग अनेक धनदांडग्यांच्या निवासासाठी प्रसिद्ध आहे. भीषण वणव्यांमध्ये त्यातील अनेकांची घरे जळाली. अनेकांना पळ काढावा लागला. मात्र समाजाकडून मिळालेली मदतही खूप मोठी होती. अर्थातच ती अत्यंत महत्त्वाची म्हणावी लागेल. उदाहरणार्थ, बाधितांना आर्थिक मदत पुरवण्यासाठी सरकारकडून लगोलग वेबसाईट कार्यान्वित करण्यात आली. त्यात रेडक्रॉसने मोठी मदत देऊ केली. अमेरिकेच्या नॅशनल गार्ड सर्व्हिसची मदतही मोठी आहे. अनेक खासगी संस्थांकडून आलेली तसेच वैयक्तिकरित्या केली गेलेली मदतही बरीच मोठी आहे. आपल्याकडे अशी एखादी दुर्घटना घडते तेव्हा मदतीचा सगळा भार वा अपेक्षा सरकारकडून केली जाते. सरकारनेच सर्व काही सावरावे, अशी इच्छा असते. या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील ताजे उदाहरण खूप काही शिकवून जाणारे आहे.



पर्यावरण

आशय अभ्यंकर
ज्येष्ठ अभ्यासक

अमेरिकेच्या आगनियंत्रण यंत्रणेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार आगीमध्ये तब्बल दहा हजार इमारती उद्‌ध्वस्त झाल्याचे समजते. या इमारतींमध्ये वास्तव्य करणाऱ्या दोन लाख लोकांवर घरे सोडण्याची वेळ आली. प्रचंड गोंधळ उडाला. मात्र असे असूनही मृतांची संख्या वीसपेक्षा जास्त वाढली नाही. हेदेखील खूप महत्त्वाचे आहे, कारण आपल्याकडे असे काही घडते तेव्हा परिस्थितीचा सामना करणारी यंत्रणाच नसल्याचे चित्र समोर येते. आपल्या फॉरेस्ट डिपार्टमेंटने 2011 मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतामधील 21.05 टक्के भाग जंगलाने व्यापलेला आहे. आणखी एका आकडेवारीनुसार 2015 मध्ये भारतातील जंगलांमध्ये सुमारे 16 हजार वणवे लागले. 2017 मध्ये हा आकडा 36 हजारांपर्यंत गेला. आपत्ती व्यवस्थापन रिपोर्टनुसार आपल्याकडील 50 टक्के वनांमध्ये आगीला कारक ठरणारी स्थिती आहे. त्यामुळेच आपल्याकडे अमेरिकेसारखी स्थिती उद्भवल्यास जंगलांमधील जीवसृष्टी बाधित होईलच, खेरीज वनांच्या बफर झोनमध्ये आदिवासी समुहातील जाती-प्रजातींची मोठ्या प्रमाणात वस्ती असल्यामुळे नुकसानीची तीव्रता कैक पट अधिक असेल. आदिवासी वा जंगलामध्ये राहणाऱ्या इतर जाती-जमातींचे संपूर्ण आयुष्य वनसंपदेशी जोडलेले असते. वनांमधील रहिवास हीच त्यांची ओळख असते. त्यात अनेक सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक धागे सोडलेले असतात. मात्र असे असले तरी जंगलांना लागणाऱ्या आगींचा सामना करण्यासाठी भारताकडे आजमितीला तरी कोणतेही धोरण बघायला मिळत नाही.

दुसरी बाब म्हणजे वनांमध्ये राहणाऱ्या लोकांकडे अशा आगीपासून स्वत:चा बचाव करण्यासाठी कोणतीही आधुनिक, तंत्रसज्ज उपकरणे नाहीत. आजही ते प्राचीन काळापासून वापरात असणाऱ्या गोष्टींचा वापर करतच अशा संकटांचा सामना करताना दिसतात. आपल्याकडे जंगलांना आग लागण्याच्या बहुसंख्य घटना मध्य भारतात बघायला मिळाल्या आहेत. मध्य प्रदेश, ओरिसा आणि छत्तीसगड या पट्ट्यामध्ये अशा आगी मोठ्या प्रमाणावर लागतात आणि या तिन्ही भागांमध्ये आदिवासी जनजातींचे प्रमाण खूप मोठे आहे. हे सगळे पाहता काही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एक म्हणजे आपल्याला शास्त्रशुद्ध विदेची अत्यंत गरज आहे. जंगलांना लागलेल्या आगीमुळे आपले किती नुकसान झाले, याची सविस्तर आणि नेमकी आकडेवारी आपल्याकडे असायला हवी. ती हाती असल्यास नुकसान कमी करण्यासाठी सरकारकडे किती आर्थिक बळ असणे आवश्यक आहे, हे समजू शकेल. आपत्कालिन परिस्थितीमध्ये किती लोकांचे स्थलांतर करावे लागेल, कितीजणांना मदत पुरवावी लागेल याचा आराखडा सरकारसमोर असणेही गरजेचे आहे. त्याचबरोबर जंगलाला लागणारी आग रोखण्यासाठी वा त्या वेळेत नियंत्रित करण्यासाठी आपल्याकडे कोणत्या पायाभूत सुविधा आहेत, याचाही अभ्यास व्हायला हवा कारण वातावरणातील धोकादायक बदल आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे अमेरिकेत उद्भवलेल्या स्थितीचा धोका आता सर्वांनाच आहे. त्यामुळे भारतालाही फॉरेस्ट मॅनेजमेंटचा विचार करावा लागेल. याबाबत अगदी ग्रामसभेपासून, राज्य तसेच केंद्र सरकारपर्यंत सर्वांचा सहभाग असेल तरच अपेक्षित परिणाम साधता येईल.

अमेरिकेतील घटनेमध्ये विम्याचे कवच असल्यामुळे लोक निर्धास्तपणे घरे सोडून बाहेर पडू शकले. भारतामध्ये तशी स्थिती नाही. त्यामुळेच कोणत्याही आपत्तीमध्ये घर सोडण्याची वेळ येते तेव्हा नुकसानीच्या, सर्वस्व गमावण्याच्या भीतीपोटी वा त्याची भरपाई होणे शक्य नसल्याचे समजून शेवटच्या क्षणापर्यंत लोक घर सोडण्यास तयार होत नाहीत. उत्तराखंडमधील पुराच्या वेळी, भूकंपामध्ये आपण अशी अनेक उदाहरणे पाहिली आहेत. पण हेच जीवितहानी वाढण्याचे महत्त्वाचे कारणही असते. खेरीज पर्यावरण विभागाने, पर्यावरणविषयक काम करणाऱ्या संस्थांनी संवेदनशील भागामध्ये विकासकामे न करण्याबाबत दिलेल्या सूचना न पाळण्यामुळेही आपल्याकडे अनेक आपत्ती उद्भवल्या आहेत. उदाहरणार्थ, माधव गाडगीळ समितीने पूर्व घाटामध्ये कोणत्याही प्रकारचे खाणकाम वा विकासकामे करु नका, असे स्पष्ट सांगितले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**




## राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. रखडलेली कामं पुन्हा प्रलंबित राहतील. विद्यार्थ्यांना यश लाभेल.
- **वृषभ** : आर्थिक बाबतीत स्थैर्य लाभेल. जुनी येणी सहज वसूल होतील. कार्यकर्तृत्त्वाला मोठा वाव मिळेल.
- **मिथुन** : महत्त्वाचे करार मार्गी लागतील. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. कौटुंबिक वाद वेळीच टाळावेत.
- **कर्क** : मनाप्रमाणे साऱ्या बाबी जमून येतील. नोकरीत बदली, बढतीचे योग आहेत. संधींचा योग्य लाभ घ्या.
- **सिंह** : कामाचा ताण वाढता राहील. महत्त्वाच्या भेटीतून समाधान मिळेल. विद्यार्थ्यांना लाभ होईल.
- **कन्या** : सरकारी कामांसाठी पाठपुरावा करावा. प्रकृतीच्या किरकोळ तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी.
- **तूळ** : गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. व्यवसायात स्वमताग्रह टाळायला हवा. कामं रखडतील.
- **वृश्चिक** : मोठ्या खरेदीचा उत्साह राहील. चैनीवर अधिक खर्च होईल. चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात.
- **धनु** : ताण कमी होईल. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात अनुकूलता राहील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **मकर** : अर्थ विषयक कामं मार्गी लागतील. नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. छोटा–मोठा प्रवास घडेल.
- **कुंभ** : आजचा दिवस धावपळीचा राहील. योजनांना चालना मिळेल. घर दुरूस्तीसाठी प्रयत्न होतील.
- **मीन** : अचानक धनलाभ संभवतो. आर्थिक उत्कर्षाच्या संधी लाभतील. रखडलेल्या कामांना गती मिळेल.

## १५ जानेवारी


दिनविशेष

२००२ : सामान्य नागरिकांनाही भारतीय राष्ट्रध्वज घरावर लावता येईल हा उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य असल्याचं सर्वोच्च न्यायालयाचं मत.
२०१३ : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे समाजशास्त्रज्ञ डॉ. शरच्चंद्र दामोदर गोखले यांचं हृदयविकाराच्या झटक्याने निधन.
२०१४ : दलित पँथरचे संस्थापक, शोषितांच्या वेदना कवितेतून बुलंद करणारे क्रांतिकारी कवी, लढवय्ये नेते पद्मश्री नामदेव ढसाळ यांचं निधन.
२०१५ : लोकसभा निवडणुकीदरम्यान जमावबंदी प्रकरणी नक्वी यांना शिक्षा.

## महत्त्व 'ड' जीवनसत्त्वाचं

आरोग्यमंत्र

शरीराची कार्यक्षमता उत्तम राहण्यासाठी तसंच आरोग्यदायी जीवनासाठी जीवनसत्त्वं गरजेची ठरतात. विविध भाज्या, फळं यातून या जीवनसत्त्वांची गरज पूर्ण केली जाते. त्यादृष्टीने आज 'ड' जीवनसत्त्वाची माहिती घेऊ. खरं तर प्रत्येकाची 'ड' जीवनसत्वाची गरज वेगळी असते. वयानुरूप त्यात बदलही होत जातात. परंतु सर्वसाधारणपणे ७० वर्षांपर्यंत ४००–६०० आययू (इंटरनॅशनल युनिट) 'ड' जीवनसत्त्वाची गरज असते.



✻ 'ड' जीवनसत्त्वाच्या कमतरतेची लक्षणं जाणवल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधं घ्यायला हवी. '२५ हायड्रॉक्सी' या चाचणीद्वारे शरीरातील 'ड' जीवनसत्त्वाची पातळी मोजता येते. ✻ 'ड' जीवनसत्त्वाचं अतिरिक्त प्रमाण आरोग्यासाठी विषासमान ठरू शकतं. ✻ 'ड' जीवनसत्त्वाची शरीरातील पातळी वाढल्यास रक्तातलं कॅल्शियमचं प्रमाण वाढू शकतं. अतिरिक्त कॅल्शियममुळे धमनी काठिण्यासारखा विकार उद्‌भवू शकतो. ✻ या जीवनसत्त्वामुळे वजन कमी होण्यास मदत होते. यामुळेही अनेकजण स्वत:च या गोळ्या घेण्याचा निर्णय घेतात. वास्तविक, वजन कमी करण्यासाठी 'ड' जीवनसत्त्वाच्या गोळ्या घेण्याचा निर्णय डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्यायला हवा. हलका व्यायाम, समतोल आहार अशी जीवनशैली असेल तरच 'ड' जीवनसत्त्वाच्या गोळ्या वजन कमी करण्यासाठी घेता येऊ शकतात असं तज्ज्ञांचं मत आहे.

## काळोख आणि प्रकाश

महत्त्वपूर्ण काही...

सिनेमा हॉलमध्ये संपूर्ण अंधार झाल्याशिवाय पडद्यावर चित्रपटाचं प्रक्षेपण व्हायला सुरुवात होत नाही. नाटकात रंगमंचावरच निरनिराळ्या दिव्यांचा वापर करून खास प्रकाशयोजना केली जाते. तरी नाटकाचा पडदा वर गेला की सभागृहात काळोख केला जातो. घरात टीव्ही बघायचा तर अंधाऱ्या खोलीत तो पाहू नये असंच सांगितलं जातं. असं का? तर टीव्ही संचाचा पडदा हा एक निर्वात नलिकेचा पुढचा पृष्ठभाग असतो. त्या नलिकेच्या पाठच्या बाजूला असलेल्या यंत्रणेतून इलेक्ट्रॉनचा मारा त्या पडद्यावर होतो आणि त्यातून होणाऱ्या प्रक्रियेतून पडदा उजळून निघतो. एलसीडी किंवा एलईडी टीव्हीमध्ये वेगळ्या प्रकारची व्यवस्था असली तरी त्यांचे पडदेही पाठीमागून उजळून निघतात. त्यामधून येणाऱ्या प्रकाशाची तीव्रता जास्त असते आणि त्या प्रखर प्रकाशात निरनिराळ्या चित्रानुसार सतत बदल होत असतो. खोलीत काळोख असेल तर आपल्या डोळ्यांना त्या सतत बदलणाऱ्या प्रखर प्रकाशाच्या किरणांना सामावुन घेण्यासाठी आपल्या बाहुलीचा विस्तार वेगाने कमी जास्त करावा लागेल. त्याचा डोळ्यांवर ताण पडून डोळे दुखायला लागण्याची शक्यता असते.

## स्नेहबंध व्हावे दृढ

सल्ला मोलाचा

आयुष्य कसंही असलं तरी त्यात समाधान मानणं महत्त्वाचं असतं. आयुष्याची गोडी अनुभवता यायला हवी. परंतु आपल्या आजुबाजुला अशी काही माणसं असतात की, सारं मनासारखं होऊनही चिंतीत असतात. तर काही जणांच्या आयुष्यात बेरजेपेक्षा वजाबाकी अधिक असुनही समाधानी राहतात. त्यांना आयुष्याची गोडी अनुभवता येते. सकारात्मक दृष्टीकोनाचा हा परिणाम असतो. केवळ वैयक्तिक जीवनातच नव्हे तर इतरांच्या आयुष्यातही आनंद निर्माण व्हावा यासाठी धडपडणारेही आहेत. या पार्श्वभूमीवर आपण निदान इतरांशी स्नेहाचे संबंध कायम राहण्यासाठी किंबहुना ते वृध्दींगत होण्यासाठी आवर्जून प्रयत्न करायला हवेत. हाच संदेश मकर संक्रांतीच्या उत्सवातून दिला जातो. मकर संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत साजऱ्या होणाऱ्या या उत्सवात साऱ्यांना समाधानाची अनुभूती मिळते. परंतु हे समाधान केवळ एखाद्या उत्सवापुरतं मर्यादित राहता कामा नये. ते अखंड राहील याकडे लक्ष दिलं जायला हवं.

## पंचांग

**बुधवार, १५ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष कृ. २, नक्षत्र : पुष्य
चंद्रराशी : कर्क, प्रीति योग,
सूर्योदय : ७.१४, सूर्यास्त : ६.२१

## फॉरवर्ड्स

आयुष्य मजेत जगायला हवं...
**शिकवे तो सभी को है जिंदगी से,**
**पर जो मौज मे जीना जानते है वो शिकायत नही किया करते...**

## वाचा तर खरं

प्रसिद्ध किंवा श्रीमंत व्यक्तींच्या आसपास सतत सुरक्षारक्षकांचा गराडा असतो. या व्यक्ती सुरक्षित रहाव्यात म्हणून कडेकोट सुरक्षेचा प्रबंधही केला जातो. ब्रिटनचं राजघराणंही याला अपवाद नाही. जगभरामध्ये ब्रिटनच्या राजघराण्याबद्दल कुतुहल आहे. या राजघराण्यातील मंडळींच्या सुरक्षेविषयी विशेष काळजी घेतली जाते. पण तुम्हाला माहित आहे का? राजघराण्यातील सर्व सदस्य एकत्रित प्रवास कधीच करत नाहीत! याला कारण म्हणजे एखाद्या विमानाला अपघात झाला तर गादीला एकतरी वारस असावा.

## अनुभवा भटकंतीची धमाल

भटकंती

मित्रांनो, आता हिवाळ्याचे काही दिवस उरले आहेत. या काळात भटकंतीची हौस पूर्ण करून घ्यायला हवी. अर्थात, भटकंती करायची तर ठिकाणंही खास हवीत. काही ठिकाणी मुलांची गँग खूप धमाल करू शकते. मित्रांसोबत भटकंतीला जात असाल तर या ठिकाणांचा विचार करा.



✻ डिसेंबर–जानेवारीमध्ये लडाख गोठलेलं असतं. पण थंडी कमी झाल्यावर लेह–लडाखला जाऊ शकता. बाईक किंवा कारने जाता येईल. मस्तपैकी मजा मस्ती करत, निसर्गसौंदर्य न्याहाळत तुम्ही भटकंती करू शकाल. ✻ ऋषीकेश हे अत्यंत पवित्र स्थान आहे. ऋषीकेश हे शांत आणि धार्मिक स्थान आहे. इथे गेल्यावर मन:शांती मिळू शकेल. महानगरातल्या धकाधकीच्या जीवनातून काही काळ ब्रेक घ्यायचा असेल तर ऋषीकेशची सैर करा. ✻ डिसेंबर–जानेवारी महिन्यात हिमाचल प्रदेशची सैर करता येईल. सिमला, कुलू–मनालीशिवाय इथे इतरही बरीच ठिकाण आहेत. इथे शांत आणि निवांत क्षण अनुभवता येतील. ✻ या दिवसात समुद्रकिनाऱ्यांची सफर करता येईल. कोकण, कर्नाटकचा किनारी भाग, तमिळनाडू, केरळ या राज्यांचा दौरा करता येईल. गोवा हा सुद्धा खूप चांगला पर्याय आहे. त्यामुळे आपला ग्रुप जमवा आणि भटकंतीला निघा.

## पत्ता द्या...

खेचाखेची

एकदा तीन इसम एका साधूजवळ गेले. त्यावेळी त्यातील एक जण साधूला म्हणाला, 'मला लक्षाधीश करा.' तर दुसरा म्हणाला, 'मला करोडपती करा'.

त्या दोघांना तथास्तू म्हणून आशीर्वाद दिल्यावर साधूने तिसऱ्याला विचारलं, 'बोल, आता तुला काय वर देऊ?'

त्यावर तो तिसरा इसम म्हणाला, 'मला त्या दोघांचे पत्ते आणि संपर्क क्रमांक द्या. पुढचं मी पाहून घेईन.'

## वेगळे काही

अनेकांच्या डोळ्यात हॉलला लागून टेरेस असणारं घर तरळत असेल. पण आता हॉलला लागून स्काय गॅरेज असेल असं घर खरेदी करण्याचं स्वप्न बघण्याइतके डोळे सक्षम बनवा. कारण सिंगापूरमध्ये असं अपार्टमेंट बांधलं आहे. 'हॅमिल्टन स्कॉट' नावाच्या इमारतीत रहिवाशांसाठी मल्टी लेव्हल पार्किंग आहेच, पण काही 'मालदार' रहिवाशांसाठी स्काय गॅरेजचीही सोय आहे. यासाठी हॉलला लागून पार्किंगची खास सोय केली गेली आहे. त्यासाठी स्पेशल लिफ्ट आहे. म्हणजे गाडी थेट लिफ्टमध्ये आणि लिफ्ट थेट स्काय गॅरेजमध्ये... वाहऽऽऽ क्या एंट्री है!!!

## ठामपणे निर्णय घे

समुपदेशन

मी पस्तिशीतली हाऊस वाईफ आहे. सोशल वर्क ही माझी पॅशन आहे. पण मुलं मोठी होईपर्यंत एकाने जॉब करायचा आणि दुसऱ्याने घर सांभाळायचं हे ठरल्याने सध्या कामासाठी वेळ देऊ शकत नाही. त्याबद्दल माझी नाराजीही नाही. पण नवऱ्याच्या ग्रुपमध्ये, त्याच्या मित्रांच्या बायकांच्या किटी पार्टीजमध्ये मन रमत नाही. नवरा आग्रहाने तिथे पाठवतो. त्या कार्यक्रमांमध्ये नवऱ्याचे पैसे कसे उधळायचे हा एकमेव विचार असल्यासारखं वाटतं. पण मी तिथे जायला नकार दिला की नवऱ्याचा मूड बिघडतो. काय करु काही समजत नाही.



– जगण्याला थेट स्पर्श करणाऱ्या क्षेत्रामध्ये काम करण्याचा अनुभव घेतल्यावर अथवा शिक्षण घेऊन त्यातच पुढे जाण्याची इच्छा असल्यास अशा विश्वात जगणं शक्य होणार नाही. त्यामुळे मुकाट सहन करत राहिलीस तर सतत दु:खी राहशील. त्यापेक्षा एकदाच ठामपणे तुझा निर्णय ऐकव. त्याच्या सामाजिक पतीचं, विचारांचं, मतांचं आणि आग्रहाचं दडपण बाळगण्याने काही होणार नाही. मुलं शाळेत गेल्यावर सामाजिक कार्यासाठी वेळ काढायला सुरूवात कर. त्यामुळे तुझा निर्धार किती पक्का आहे हे समजेल आणि तुलाही काम केल्याचं समाधान मिळवता येईल.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

# श्री म्हाळसाकांत खंडोबा-म्हाळसाईचा विवाह सोहळा

## पौष पौर्णिमेला विवाह सोहळा धामणी (ता. आंबेगांव) येथे पारंपारिक वाद्याच्या गजरात, शाही थाटात संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** पौष पौर्णिमेला श्री म्हाळसाकांत खंडोबा व म्हाळसाई देवीचा विवाह सोहळा धामणी (ता. आंबेगांव) येथे पारंपारिक वाद्याच्या गजरात व हजारो भाविकांच्या उपस्थितीत शाही थाटात पार पडला.

सोमवारी पौष पौर्णिमेनिमित्त पहाटे धामणीच्या खंडोबा मंदिरात स्वयंभू सप्तशिवलिंगाचा अभिषेक व आरती करण्यात आली. त्यानंतर सेवेकरी धोंडीबा भगत, दादाभाऊ भगत, सुभाष तांबे, प्रभाकर भगत, शांताराम भगत, दिनेश जाधव, माऊली जाधव वाघे, सिताराम जाधव वाघे, राजेश भगत, पांडुरंग भगत, राहुल भगत यांनी व महिला भाविकांनी स्वयंभू सप्तशिवलिंगाला व सर्वांगसुंदर खंडोबा व म्हाळसाईच्या मुखवट्याला चंदन उटीचा लेप दिला व त्यावर सुंगधी दवणाच्या अत्तरात मिश्रित केलेली हळद लावण्यात आली. यावेळी देवाला हळद लावण्यासाठी महिला भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती. त्यानंतर भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. यावेळी महाळुंगे पडवळ, गावडेवाडी, लांडेवाडी, तळेगांव ढमढेरे, लोणी, खडकवाडी, रानमळा, पाबळ, अवसरी खुर्द, संविदणे येथील मानकरी व भाविक उपस्थित होते. सकाळी दहा वाजता बाळासाहेब महादू बढेकर, विठ्ठल बढेकर,अंकुश बढेकर यांच्या मानाच्या मांडव डहाळ्याची पारंपारिक वाद्याच्या गजरात मिरवणूक काढण्यात येऊन सजवलेल्या बैलगाड्यातील मांडवडहाळे मंदिरात सदानंदाचा येळकोट करून व भंडाऱ्याची उधळण करुन देवाला अर्पण करण्यात आले.

श्री म्हाळसाकांत खंडोबा व म्हाळसाईदेवी यांच्या लग्न सोहळ्यानिमित्त मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. मंदिरात देवाला पूजा करुन खंडोबाला व म्हाळसाईच्या देखण्या मूर्तीला बाशींग व मुंडावळ्या घालण्यात आल्या. पेठेतील मुक्ताबाई मंदिरात पौष महिण्याच्या पालखीचे मानकरी समस्त करंजखेले मंडळीच्या हस्ते आरती करण्यात आल्यानंतर दुपारी सेवेकरी मंडळीनी मंदिरातील पंचधातूच्या खंडोबाच्या मुखवट्याला बाशींग व मुंडावळ्या बांधून मुखवटा पालखीत ठेवल्यानंतर पारंपारिक वाद्याच्या गजरात मिरवणूकीला सुरुवात झाली.





### विलोभनीय लग्न सोहळा!

● पौष पौर्णिमेला होणारा खंडोबा म्हाळसा विवाह सोहळा हा विवाहदिनाची आठवण जागवणारा भावुक व आनंदी सोहळा सणासारखा साजरा करण्यात येतो. हा एक लोकोत्सव असून, पिढी दरपिढी चालत आलेल्या रितीरिवाजाप्रमाणे हा सोहळा पाल (ता. कराड-सातारा) येथे व ठिकठिकाणच्या खंडोबा मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आपल्या लोकसंस्कृतीचा जवळून परिचय व्हावा, म्हणून प्रत्येकाने एकदा तरी पौष पौर्णिमेच्या खंडोबा म्हाळसा यांच्या पवित्र विवाह सोहळ्यास उपस्थित राहून हे देवकार्य बघावे, असा हा विलोभनीय क्षणाचा लग्न सोहळा धामणी ग्रामस्थांनी साजरा करून पूर्वापांर परंपरेचे जतन करत असल्याचे कौतुक वेदाचार्य वामन बाळकृष्ण मरकळे आळंदीकर यांनी सांगितले.

पौष महिण्यातील शाकंभरी पौष पौर्णिमेच्या पालखीचा पारंपारिक मान समस्त करंजखेले मळ्याला असतो. मिरवणूकीत करंजखेले, कदम, करंडे, सांडभोर, वाळूंज आडनावाचे भाविक मोठ्या उत्साहात सहभागी झालेले होते. महिला भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर होती. मिरवणूकीत महिलांनी फुगडी खेळून रंगत आणली. खंडोबाचे वाहन असलेला रुबाबदार अश्व (घोडा) यात सामील झालेला होता. यावेळी मिरवणूकीत पालखीवर फुलाच्या पाकळ्या, अक्षता व भंडारा उधळण्यात येत होता. फटाक्याची आतषबाजी करण्यात आली. पालखीची मिरवणूक सायंकाळी पावणेपाच वाजता मंदिरात विसावली. मंदिराच्या आवारात देवाच्या विवाह सोहळ्यासाठी आकर्षक मंडपातील सजवलेल्या स्टेजवर नवरदेव म्हाळसाकांत खंडोबाचे महिलांनी ओवाळणी करुन स्वागत केले. त्यानंतर सनई व तुतारीच्या निनादात खंडोबाचा मुखवटा स्टेजवर आणण्यात आला. सेवेकरी मंडळीनी मुख्य मंदिरातून बाशिंग व मुंडावळ्या घातलेल्या व हिरवी साडी परिधान केलेला म्हाळसाईचा मुखवटा मंडपात आणला. मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून हजारो वऱ्हाडी मंडळीच्या उपस्थितीत सायंकाळी ५ वाजता खंडोबा म्हाळसाईच्या विवाह सोहळ्याला सुरुवात झाली.

» Selected

## केंदूरचे विद्यालयाचे एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत यश



**शिक्रापूर :** केंदूर (ता. शिरुर) येथील सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज विद्यालयातील विद्यार्थांनी शासकीय इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षेत यश संपादित केले. या विद्यालयाने शासकीय रेखाकला एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत यश संपादित करत नेत्रदिपक यश संपादित केले असल्याची माहिती प्राचार्य अनिल साकोरे यांनी दिली आहे. केंदूर येथील सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी कलाशिक्षक संजय जोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड व शासकीय रेखाकला एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत सहभाग घेतला. यापूर्वी शासकीय इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून नुकतेच रेखाकला एलिमेंटरी ग्रेड परीक्षेचा निकाल श्माभर टक्के लागला. सदर परीक्षेत अ श्रेणीत ५, बश्रेणीत १० तर क श्रेणीत ३१ विद्यार्थ्यांनी यश मिळवले असताना अ श्रेणीत आदिती थिटे, जान्हवी पऱ्हाड, संस्कृती साकोरे, सावी चौधरी व स्वराली ताठे यांनी तर ब श्रेणीत आरूषी दाते, अपेक्षा भंडारे, आराध्या थिटे, अविनाश सुक्रे, सार्थक साकोरे, सायली साकोरे, सेजल ढसाळ, श्रावणी थिटे, श्रेया भोसुरे, सोनाक्षी सुपेकर यांनी आणि क श्रेणीत आदित्य गरुड, अनुजा साकोरे, आराध्या ताठे, आर्यन साकोरे, देवयानी पऱ्हाड, हर्षद सुक्रे, ईश्वरी साकोरे, जानवी सुक्रे, जुनेद शेख, करण कदम, कार्तिक थिटे, कार्तिकी डेरे, नंदिनी गावडे, माही लोखंडे, प्राची गाडेकर, ओम सोनवणे, प्रणिती थिटे, राधा सोनवणे, साईराज साकोरे, समाधान सुक्रे, संभव सुपेकर, सानिका ताठे, शर्वरी पऱ्हाड, श्लोक विधाटे, श्रावणी चव्हाण, श्रावणी ताठे, सिद्धी थिटे, सोहम पऱ्हाड, सृष्टी भोसुरे, विराज थिटे व यशश्री लिमगुडे या विद्यार्थ्यांनी यश संपादित केले, सर्व यशस्वी विद्यार्थी व कलाशिक्षक संजय जोहरे यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सेवक व विद्यालयाचे प्राचार्य अनिल साकोरे यांसह आदींनी अभिनंदन केले आहे.

# पाणी रे पाणी तेरा रंग कैसा?

## नगरपरिषद छोडे उस डगर, नाली, गटर जैसा..

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** राजगुरुनगर शहराला नवीन योजनेचा पाणीपुरवठा लवकरच सुरू होणार आहे. मात्र त्यासाठी रोज वेगवेगळ्या भागात, रस्त्यांवर मुख्य पाईप लाईनला जोडलेल्या पण घरात जोडणी न केलेल्या पाईपांद्वारे पाणी सोडण्यात येत आहे. गेले दोन महिने असा नगरपरिषदेच्या माध्यमातून लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होत आहे. नवीन नळ जोड देण्याआधी होणारे हे टेस्टिंग अर्थात प्रात्यक्षिक रस्त्यांवर डबकी साठण्यास कारणीभुत ठरत आहे. अगोदरच शहरातील रस्त्यांत वाहनांची वर्दळ असते . त्यात पाण्याच्या डबक्या मुळे जवळुन जाताना किंवा ओलांडताना ज्येष्ठ नागरिक, महीला, शालेय विद्यार्थ्यांना कसरत करावी लागत आहे.अनेक भागात प्यायला पाणी मिळत नसताना रस्त्यांवर मोकळ्या पाईपाचे पाणी नागरिकांना पाहायला मिळत आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून वाया जाणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन व्हावे, अशी मागणी त्रस्त शहरवासियांकडून होत आहे.



खेड — **राजगुरुनगर:** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नवीन योजनेतून टेस्टिंग म्हणुन असे वारेमाप पाणी सोडण्यात येत आहे.

चासकमान धरणाच्या पाण्यावर आधारित आणि पुर्वी चाळीस गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणुन पाणी पुरवठा योजना राबवली गेली होती. राजगुरुनगर शहराला केदारेश्वर बंधाऱ्यातुन असलेल्या योजनेतून शहराला अशुद्ध पाणी पुरवठा होत होता. अनेक प्रकारचे निधी खर्च करून आणि उपाययोजना करूनही ही योजना शहराला पाणीपुरवठा करण्यात कमी पडत होती. म्हणुन शासनाच्या माध्यमातून सन २०१८ दरम्यान चाळीस गाव योजनेचे हस्तांतरण राजगुरुनगर नगरपरिषदेडे करण्यात आले. तेव्हापासून योजनेच्या दुरुस्तीचे, शहरासाठी नवीन टाक्या, मुख्य व उप पाइपलाइन टाकण्याचे काम करण्यात आले. चासकमान धरणाच्या पाण्यात पंप बसवून वेताळे येथील शुध्दीकरण केंद्रात पाणी सोडण्यात आले. त्यासाठी आवश्यक विज पुरवठा यंत्रणा बसवण्यात मोठा खर्च आणि वेळ वाया गेला. आता ही यंत्रणा पुर्ण अर्थाने कार्यान्वित झाली असुन पुढील काही महिन्यांत शहराला शुद्ध पाणीपुरवठा होणार आहे. जवळपास २३ किलोमिटर अंतरावरून आणलेले आणि थेट धरणांतून तेही शुद्ध केलेले पाणी नागरिकांना उपलब्ध होणार आहे.

> “राजगुरुनगर शहराला दोन महिन्यात शुद्ध पाणी मिळणार आहे. दीड दोन महिन्यांपासून नव्या योजनेतील शुध्दीकरण केंद्र,२३ किमी अंतरावरची मुख्य जलवाहिनी, शहरातील मुख्य, उप लाईन यंत्रणेचे परीक्षण केले जात आहे.भविष्यात अडचण निर्माण होणार नाही यासाठी हे परीक्षण गरजेचे आहे. वाया जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रशासनाकडून कारवाई गरजेची आहे."
> **— शिवाजी मांदळे,** माजी नगराध्यक्ष, राजगुरुनगर नगरपरिषद

> “अडीच -दोन महिने पाणी रस्त्यावर सोडले जात आहे. पाण्याचा प्रचंड अपव्यय होतो.अनेक नागरिकांना प्यायला पाणी मिळत नाही. तर दुसऱ्या बाजूला रस्त्यांवर डबकी भरलेली असतात. काँक्रीटीकरण झालेल्या काही प्रमुख रस्त्यांवर मध्यावर गळती आहे. नियोजनाचा अभाव असल्याने सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो."
> **— राजेंद्र सुतार,** सर्वसामान्य नागरिक

## सावंत प्रतिष्ठान पुरस्कारांचे जेजुरीत वितरण



**जेजुरी :** कै दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने रौप्य महोत्सवी वर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्य व जिल्हास्तरीय पुरस्कार पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सावंत स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने सलग पंचविसाव्या वर्षी जेजुरी जिजामाता महाविद्यालयात पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते.

जेजुरी देवसंस्थानचे माजी प्रमुख विश्वस्त, व्याख्याते, लेखक, माजी प्राचार्य डॉ नारायण टाक यांना राज्यस्तरीय समाजभूषण, जेजुरी देवसंस्थानचे व्यवस्थापक सतीश घाडगे यांना आरोग्यसेवक, पुरोहित दत्तप्रसाद खाडे यांना भक्ती भूषण पुरस्कार, प्रसिद्ध गायक विकी कदम यांना संगीत रत्न, श्री खंडोबा पालखी सोहळा खांदेकरी मानकरी, समस्त ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, वन्यजीवांना पाणी व चाऱ्याची व्यवस्था करणारे विशाल बारभाई व जानाई देवी जिर्णोद्धार समितीचे माणिक पवार यांना जनसेवा पुरस्कार, सोमनाथ काळाने यांना आदर्श पत्रकारिता आणि विलास कड यांना आदर्श उद्योजक पुरस्कार माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन सावंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सावंत,पुरस्कार समितीचे अध्यक्ष राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य नंदकुमार सागर, देवसंस्थानचे माजी विश्वस्त नितीन राऊत, जिमाचे कार्याध्यक्ष रवींद्र जोशी, प्रतिष्ठानचे सचिव प्रल्हाद गिरमे, डॉ सुमित काकडे, संतोष सावंत यांनी केले.

## कान्हूर मेसाईच्या बोगस डॉक्टरवर गुन्हा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कान्हूर मेसाई येथे निसर्ग उपचार केंद्र नावाने बनावट पदवी घेऊन हॉस्पिटल चालवणाऱ्या बनावट डॉक्टरवर शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सजल कांती बिस्वास असे पोलिसांनी गुन्हा दाखल केलेल्या बोगस डॉक्टरचे नाव आहे.

कान्हूर मेसाई येथे एक इसम बनावट पदवी घेऊन कोणतेही वैद्यकीय मान्यता प्राप्त प्रमाणपत्र नसताना जवळ औषधांचा साठा बाळगून नागरिकांवर वैद्यकीय उपचार करत असल्याची माहिती शिरुर तालुका वैद्यकीय अधिकारी राजेश कट्टीमनी यांना मिळाली. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र कवठे येमाईचे वैद्यकीय अधिकारी सौरभ ढमढेरे, आरोग्य सेवक विनायक गोसावी यांसह आदींनी कान्हूर मेसाई येथील निसर्ग उपचार केंद्र येथे जात, तेथील डॉक्टरकडे वैद्यकीय प्रमाणपत्राची मागणी केली असता, त्या डॉक्टरने ग्रामीण निसर्ग उपचार औरंगाबादचे अनुभव प्रमाणपत्र दाखवले.

दरम्यान, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता, या बोगस डॉक्टर जवळ वेगवेगळ्या औषधांचा साठा मिळून आला. मात्र, त्या औषधांच्या परवानाबाबत विचारणा केली असता, कोणताही परवाना मिळून आला नाही.

## इंदापूर येथे कृषी प्रदर्शन स्टॉलचे भुमिपूजन उत्साहात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** कृषी उत्पन्न बाजार समिती, इंदापूरने मुख्य बाजारातील अद्यावत मार्केटमध्ये इंदापूर कृषी महोत्सव अंतर्गत बुधवार (दि. २२ ते रविवार दि. २६ जानेवारी दरम्यान पाच दिवसीय कृषी, पशु-पक्षी, जनावरे व डॉग शो तसेच घोडे बाजार दरवर्षीप्रमाणे आयोजन केलेले आहे.



बाजार समितीचे मार्गदर्शक तसेच पुणे जिल्हा बँकेचे संचालक तथा माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे, सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके, माजी आमदार यशवंतराव माने यांनी याबाबतची माहिती कृषी महोत्सव स्टॉल उभारणी भुमिपुजन प्रसंगी दिली. स्टॉल उभारणीचे भुमिपुजन संजय काचोळे, जिल्हा अधिक्षक, कृषी विभाग, पुणे यांच्या हस्ते करण्यात आले.

शेतकरी बांधवांनी दुष्काळी परिस्थिती व नैसर्गिक आपत्ती यावर मात करुन ऊस शेती, फळबाग, भाजीपाला, भुसार वगैरे उत्पादने घेत असुन त्यांच्या शेती विषयक लागवड व उत्पादनास अधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळुन त्यांचे शेती व शेतीपुरक व्यवसाय उत्पादनात वाढ व्हावी या उद्देशाने बाजार समितीने कृषी प्रदर्शनाचे आयोजन केलेले आहे. या प्रदर्शनास प्रवेश मोफत आहे. इंदापूर बाजार समिती ही भुसार, मासे (मासळी), डाळींब, कांदा, पेरु, ड्रॅगन, सिताफळ यासाठी प्रसिद्ध बाजारपेठ असून, समितीने शेतकऱ्यांसाठी अद्यावत सर्व सोयीयुक्त हक्काची बाजारपेठ उपलब्ध केलेली आहे.

## करंदीतील डोंगराला वणवा



**शिक्रापूर :** करंदी येथील डोंगराला रात्रीच्या वेळी वणव्याने भीषण आग लागली. यात झाडांचे मोठे नुकसान झाल्याची घटना घडली. सुदैवाने, स्थानिक नागरिकांच्या प्रयत्नाने आग आटोक्यात आल्याने अनर्थ टळला आहे.

करंदी येथे सोमवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास अचानकपणे आग लागली. काही वेळात आगीने रौद्ररुप धारण केल्याचे नागरिकांच्या लक्षात येताच सामाजिक कार्यकर्ते राघू नप्ते, गोविंद नप्ते, राजेंद्र ठाकर, रमेश नप्ते, बाळूनाना ठाकर, संदिप ठाकर यांसह आदींनी आगीवर नियंत्रण आणले. नागरिकांच्या दीड तासांच्या प्रयत्नामुळे आग आटोक्यात आली असल्याने, सुदैवाने अनर्थ टळला. वनविभागाने जंगलातील वणवे रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## शिरुर प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे २ संचालक अपात्र

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था जिल्ह्यात सर्वात जास्त उलाढाल असणाऱ्या शिक्षक पतसंस्थेचे काही संचालक बेजबाबदारपणे वागत असल्याने, अशा बेजबाबदार तसेच कर्ज थकबाकी असणाऱ्या व सभेला गैरहजर राहणाऱ्या दोन संचालकांना अपात्र करण्याची मागणी पतसंस्थेचे सभासद शंकर शिंदे यांनी केली होती. शिरुरचे सहाय्यक निबंधक यांनी याची दखल घेत, संचालक बबन संपत म्हाळसकर व नंदकिशोर निवृत्ती पडवळ या दोघांना अपात्र ठरवले.

शिरुर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था जिल्ह्यात सर्वात जास्त उलाढाल असणारी शिक्षक पतसंस्था असून, सदर पतसंस्थेचे काही संचालक कर्ज थकबाकीदार असून, सभेचे नोटीस मिळून देखील सभांना तीन पेक्षा जास्त वेळ गैरहजर राहत आहेत. संचालक स्वतः थकबाकीदार असून मासिक सभांनाही अनुपस्थित असताना, त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करता सर्वसामान्य सभासदांना कर्ज वसुलीसाठी नोटिसा पाठवण्यात आल्या असल्याचे वार्षिक अहवालावरून समोर आले. सदर प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी करत बबन म्हासळकर व नंदकिशोर पडवळ या दोन संचालकांना अपात्र करण्याची मागणी शंकर मल्हारी शिंदे यांनी शिरुर तालुका सहाय्यक निबंधक अरुण साकोरे यांच्याकडे केली होती.

### ज्येष्ठ नागरिक आणि महिला, मुलांच्या जीविताला धोका

# दोन ठेकेदार नेमले तगडे... मात्र मध्यावर गटर उघडे..!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** राजगुरुनगर शहरात वाडा रस्त्यावर मोठा निधी खर्च होऊनही वाहतूक कोंडी होते. अशातच नुकतेच काम केलेल्या बंदिस्त गटारांचा काही भाग उघडा राहिला असल्याने नागरिकांच्या त्यातही ज्येष्ठ नागरिक आणि महीला, मुलांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. बंदिस्त गटाराच्या कामात दोन ठेकेदार नेमले आणि त्या दोघांच्या मतभेदाचा फटका म्हणुन वर्दळीच्या ठिकाणी गटर उघडे पडले असल्याचा प्रकार घडला आहे. नगरपरिषदेच्या दुर्लक्षाने असे प्रकार घडत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

> “दोन ठेकेदार नियुक्त केले. मात्र राहीलेल्या उघड्या गटाराची जबाबदारी कुणावर टाकायची? यावरून नगरपरिषद आणि बांधकाम उपविभाग संभ्रमात आहे. येथील वावर नागरिकांच्या दृष्टीने धोकादायक बनला असून उघड्या गटाराची दुर्गंधी परिसरात पसरली आहे."
> **— शिवाजी मांदळे,** माजी नगराध्यक्ष, राजगुरुनगर नगरपरिषद

राजगुरुनगर शहरातील वाडा रस्त्यावर सिमेंट काँक्रिट काम करण्यात आले. दीड किलोमिटर अंतर रस्त्यासाठी माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या माध्यमातून



१५ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला होता.पैकी जवळपास १३ कोटी रुपयांचा निधी खर्च झाला. रस्त्यालगत नुकतेच बंदिस्त गटर काम करण्यात आले आहे. त्यासाठी शासनाचा ४ कोटी ९९ लाख ७१ हजार १९ रुपये निधी खर्च झाला आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग खेड आणि नगरपरिषदच्या माध्यमातून हा निधी उपलब्ध झाला. त्यासाठी दोन ठेकेदार नेमले होते.दोघांच्या कामाचा शेवट पंचायत समिती चौकात तिन्हेवाडीकडे जाणाऱ्या रस्त्या लगत झाला. येथे चेंबर बनवुन तीन बाजूने आलेल्या दोन ते तीन फूट व्यासाच्या सिमेंट पाईप मधुन गटाराचे पाणी येते. हे गटर दर्शनी भागात आणि वर्दळीच्या ठिकाणी खोल असुन उघडे राहिले आहे. या खड्यात पादचारी, दुचाकी वाहने घसरून अपघात होण्याचा धोका आहे.लगतच महात्मा गांधी विद्यालय असुन येथे लहान मोठ्या इयत्तेतले सहा हजार विद्यार्थी शिकतात.

> “पुणे नाशिक महामार्गाच्या बाजूने साडेचारशे मिटर अंतरावर असलेल्या गटाराचे काम मंगलमूर्ती कन्स्ट्रक्शनने पूर्ण केले आहे. दुसऱ्या बाजूने वाळुंज ठेकेदार काम करीत आहेत. उघडे गटर असलेल्या ठिकाणी सकाळी एक अपघात झाला. तातडीने ठेकेदारांना बोलावले. या ठिकाणी नगरपरिषदेची पाणी योजनेची मुख्य पाईप लाईन आहे. इतर दोन लाईन आहेत. त्यांनी योग्य काम केले तरच पुढची कारवाई करण्यात येऊ शकते. तशा प्रकारचा संदेश नगरपरिषदेला पोहचवला आहे."
> **— नितीन दाणे,** शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खेड

# बालांगण

## पाक्यूचे अणकुचीदार दात

दोस्त हे मस्त

दोस्तांनो, मासे अनेक प्रकारचे असतात. आपण मस्त्यालयात काही प्रकारचे मासे पाहतो. प्रत्येक माशाचं काही ना काही वैशिष्ट्य असतं. काही मासे दिसण्यामुळे वेगळे वाटतात. असाच एक मासा म्हणजे पाक्यू. हा मासा इतर माशांप्रमाणेच दिसतो. मग यात वेगळं काय असं विचाराल तर उत्तर आहे या माशाचे दात. पाक्यूचे दात माणसांसारखे असतात. माणसाचे आणि पाक्यूचे दात एकत्र ठेवले तर माणसाचे कोणते आणि माशाचे कोणते हे ओळखूही येणार नाही एवढं साम्य आढळून येतं. आपल्या अणकुचीदार दातांमुळे त्याला 'द बॉल कटर' असं टोपण नाव मिळालंय. गोड्या पाण्यात सापडणारा हा मासा मस्त्यालयातही ठेवला जातो. दक्षिण अमेरिकेतल्या गोड्या पाण्यात त्याचं अस्तित्व असतं. तो विविध नद्यांमध्ये सापडतो. पापुआ न्यू गयानामध्येही तो दिसलाय. पाक्यूच्या तोंडाची रचना बरीचशी माणसासारखीच असते. फळं आणि टणक कवाचाची फळं फोडण्यासाठी तो दातांचा वापर करतो. यासोबतच इतर छोटे मासेही त्याचं खाद्य असतं. अमेझॉनच्या खोऱ्यातल्या झाडांवरून पाण्यात पडलेली फळं आणि बिया तो खातो. हे मासे फारसे भीतीदायक किंवा उपद्रवी नसले तरी त्यांच्या जबड्याची रचना त्रासदायक ठरू शकते. हे मासे माणसांना चावा घेऊ शकतात. अणकुचीदार दातांनी त्यांनी घेतलेला चावा किती वेदनादायी असेल याचा विचार न केलेलाच बरा! अमेरिकेत पाक्यू मासे पाळले जातात. कायद्यानं तशी परवानगी आहे. पाक्यूला सांभाळणं कठीण नाही. पण हे मासे बरेच वाढू शकतात त्यामुळे तशी सोय हवी. काहींना याची माहितीच नसते. घरातला फिश टँक छोटा असेल तर पाक्यू त्यातून बाहेर येऊ लागतात. अशा वेळी सरळ त्यांना तलावात किंवा नदीत सोडलं जातं. तर असा हा पाक्यू... लांबून तो सर्वसाधारण माश्यासारखाच दिसत असला तरी त्याच्यापासून लांब राहणंच योग्य ठरतं. तो चावला तर शस्त्रक्रिया करण्याशिवाय पर्याय नाही. बाकी तसा त्याच्यापासून कोणताही धोका नाही.



## छोटासा 'नौरू'

सफर देशांची

'नौरू' हा द्विपसमूह म्हणजे मध्य पॅसिफिक महासागरात वसलेला छोटासा देश. एकेकाळी 'प्लेझंट आईसलँड' अशी ओळख असलेल्या नौरूची 'यारेन' ही राजधानी. 'बनाबा' बेटं नौरूचा सर्वात जवळचा शेजारी. हे बेट नौरूच्या पूर्वेला ३०० मैल अंतरावर आहे. राष्ट्रकुल तसंच ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये हा छोटेखानी देश सहभागी होतो. नौरू हे अंड्याचा आकाराचं बेट आहे. १८८८ मध्ये जर्मनीने या बेटांवर सत्ता स्थापन केली. दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांचं नौरूवर एकत्रित राज्य होतं. १९४२ मध्ये जपानने हे बेट ताब्यात घेतलं. पण पुन्हा १९६६ पर्यंत संयुक्त राष्ट्रांच्या करारानुसार इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडने राज्य केलं. मग दोन वर्षांनी म्हणजे १९६८ मध्ये हा देश स्वतंत्र झाला. नौरू १९९९ मध्ये संयुक्त राष्ट्रांचा सदस्य बनला. या बेटांवर फॉस्फेट मोठ्या प्रमाणावर आढळतं. नौरू हा पॅसिफिक महासागरातल्या फॉस्फेटच्या दगडांपासून बनलेल्या बेटांपैकी एक. 'ओशन' बेटं आणि 'माकाटी' ही इतर दोन बेटं आहेत.



नौरूमध्ये अमेरिकेचा दूतावास नाही. फिजी या देशातले अमेरिकेचे राजदूत नौरूच्या संपर्कात असतात. या देशात फक्त एकच विमानतळ आहे. गंमत म्हणजे नौरू हा जगातल्या सर्वात जाड लोकांचा देश आहे. या देशात फारसं कोणी येत नाही. २०११ मध्ये नौरूमध्ये फिरण्यासाठी फक्त २०० पर्यटक आले होते. हा देश फारसा कोणाला माहीत नाही. ऑस्ट्रेलियन डॉलर हे इथलं चलन आहे. नोव्हेंबर ते फेब्रुवारीदरम्यान इथे पाऊस पडतो. इथे फक्त २० टक्के शेतजमीन आहे. व्हॅटिकन सिटी आणि मोनॅको एवढे दोनच देश नौरूपेक्षा लहान आहेत. या देशातल्या रस्त्यांची लांबी फक्त ३० किलोमीटर आहे. नौरूचं स्वतःचं लष्कर नाही. ऑस्ट्रेलियावर त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी आहे. त्यामुळे नौरू हा अनोखा देश म्हणायला हवा.

## ठिपके जुळवा



## मॅनेजमेंटचे नवे पर्याय

कोण होणार?

अनेकांना एमबीए करायचं असतं. एमबीए म्हटलं की विशिष्ट क्षेत्रच आपल्या समोर येतात. पण सध्याच्या काळात विविध ३० क्षेत्रांमध्ये तुम्ही एमबीए पदवी मिळवू शकता. त्यापैकीच काही वेगळ्या क्षेत्रांची ओळख करून घेऊ या.

✻ मार्केटिंगसारख्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी बऱ्याच कौशल्यांची गरज असते. संवादकौशल्यं, वैचारिक क्षमता आणि कल्पकता यांच्या बळावर तुम्ही मार्केटिंगमध्ये पुढे जाऊ शकता. 'कम्युनिकेशन मॅनेजमेंट' सारख्या क्षेत्रात एमबीए केल्यानंतर एडव्हरटायजिंग, ब्रँड कम्युनिकेशन, पब्लिक रिलेशन्स, मीडिया व मनोरंजन मॅनेजमेंट, मार्केटिंग व डिजिटल मार्केटिंगसारख्या कम्युनिकेशनवर आधारित क्षेत्रांमध्ये पुढे जाऊ शकता. या अभ्यासक्रमामुळे तुमच्यात संवादकौशल्यं विकसित होतात.



✻ फॅशन आणि लक्झरी ब्रँड्सचं क्षेत्र खूप विस्तारत आहे. या ब्रँड्सच्या उत्पादनांना जगभरातून मागणी असते. सध्या महागड्या आणि जागतिक स्तरावरच्या ब्रँड्सना कुशल तज्ज्ञांची गरज असते. कल्पकतेला या क्षेत्रात खूप प्राधान्य आहे. त्यामुळे 'फॅशन अँड लक्झरी ब्रँड मॅनेजमेंट' हा अभ्यासक्रम तुम्हाला या क्षेत्रात यश मिळवून देऊ शकतो.

✻ भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा खूप मोठा वाटा आहे. शेतीतलं उत्पन्न वाढवण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा वापर केला जातो. नव्या तंत्रज्ञानाचा विकास केला जातो. अशा परिस्थितीत 'ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट' करता येईल.ही बिझनेस मॅनेजमेंटची उपशाखा आहे.

✻ सध्याच्या काळात 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट' चा विचार केला जातो. काही वर्षांपूर्वीपर्यंत सरकारी क्षेत्रांपर्यंत मर्यादित असलेलं हे क्षेत्र आता खूप विस्तारलं आहे. म्हणूनच 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट मॅनेजमेंट' चा पर्याय तुम्हाला स्वीकारता येईल.

✻ आपली उत्पादनं ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कंपन्या सप्लाय चेन मॅनेजमेंटचा वापर करतात. म्हणूनच हा अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तम करीअर करता येईल.

## दोस्त हे मस्त

### अनोखा नारव्हेल

नारव्हेल ही व्हेल माशाची एक प्रजाती आहे. ग्रीनलँड, कॅनडा आणि रशियामध्ये हा प्राणी आढळतो. या माशाच्या तोंडातून हत्तीच्या दातांसारखा दात बाहेर आलेला असतो. हा मासा समुद्रातले कॉड फिश तसंच फ्लॅटफिश खातो.



## खादाडी

### रोटी पिझ्झा

घरी पोळी उरली असेल तर तुम्ही मस्तपैकी पिझ्झा बनवू शकता. यासाठी दीड चमचा बटर, एक पोळी, चार चमचे पिझ्झा सॉस, अर्ध्या सिमला मिर्चीचे मध्यम तुकडे करा. अर्धा कांदा कापून घ्या. अर्धा कप मॉझरेला चीज, एक चमचा चिली फ्लेक्स, चमचाभर मिक्स हर्ब्ज असं साहित्य घ्या. पोळीवर बटर लावून बेकिंग ट्रेमध्ये ठेवा. एक मिनिट कन्वेक्शनमध्ये ठेवा. आता ट्रे मायक्रोवेव्हमधून बाहेर काढा. त्यावर पिझ्झा सॉस लावा. कांदा आणि भोपळी मिरची पसरा. वरून मोजरेला चीज घाला. आता साधारण तीन मिनिटं पुन्हा बेक करून घ्या. वरून चिली फ्लेक्स आणि हर्बज घाला. तुकडे करून गरमागरम खा.



## एक्झॅम टाईम

### घाबरू नका

दोस्तांनो, तुमची परीक्षा आता अगदी जवळ आली असेल. खूप कमी दिवस राहिले म्हणून घाबरून जाऊ नका. उरलेल्या दिवसात भरपूर अभ्यास करा. आपल्या मित्रमैत्रिणींना किती अभ्यास झाला आहे असा विचार करत बसू नका. स्वतःचा वेळ अजिबात वाया घालवू नका. सुरूवातीला फार अभ्यास केला नसेला तर आता कामाला लागा. असूनही तुमच्याकडे एक महिना आहे. महत्त्वाचे प्रश्न जाणून घ्या. त्यावरच भर द्या.



## योगा टाईम

### लाभदायी दंडासन

शरीराला सक्षम करण्यासाठी दंडासन करता येईल. यात शरीराचं सगळं वजन मनगटांवर असतं. यामुळे हातांचे स्नायू बळकट होतात. तसंच पाठीच्या कण्यालाही बळकटी मिळते. यासोबतच पोटाचे स्नायूही चांगल्या प्रकारे काम करतात. म्हणूनच हे आसन नियमित करायला हवं.



## लॉलीपॉपचे फुलपाखरू

करून पहा

मित्रांनो, तुम्हाला लॉलीपॉप आवडतं का? लॉलीपॉप चघळत बसायला किती मजा येते ना! काही वर्षांपूर्वी तर लॉलीपॉपची प्रचंड क्रेझ होती. ही क्रेझ आता काही प्रमाणात कमी झाली असली तरी अनेकांना अजून या प्रकारचं चॉकलेट आवडतं. वेगवेगळ्या फ्लेवर्सचे लॉलीपॉप्स चवीलाही छान लागतात. हेच लॉलीपॉप वापरून तुम्ही छानसं क्रिएटिव्ह आर्ट तयार करू शकता. ही कलाकृती तुम्ही भेट म्हणूनही देऊ शकता.



साहित्य : क्राफ्ट पेपर, कात्री, सेलोटेप, गम, लॉलीपॉप.

कृती : मित्रांनो, कागद फुलपाखराच्या आकारात कापायचा आहे. म्हणजे पंख फुलपाखराचे हवेत. यासाठी फुलपाखराच्या चित्राची किंवा पंखांची प्रिंट काढून घेता येईल. या प्रिंटचा वापर करून तुम्ही पंखांचा आकार कापून घेऊ शकता. पंख थोडे मोठे असू द्या. पंखांचं चित्र काढूनही आकार कापता येईल. तुम्हाला सोपं वाटेल त्या पद्धतीनं पंखांचा आकार कापून घ्या. पांढरा आणि लाल रंगाचे किंवा तुमच्या आवडीच्या रंगांचे कागद वापरता येतील. लाल रंगाच्या कागदाचे मोठ्या आकाराचे तुकडे कापा. पांढऱ्या कागदाचे चार बदामाचे आकार कापा. तुम्हाला इतर कोणतीही नक्षी काढता येईल. इतर आकार कापायचे असतील तर तेही कापता येतील. आता मोठे तुकडे एकमेकांवर चिकटवा. ते फुलपाखराचे पंख वाटायला हवेत. आता पांढरे बदामाचे आकार त्यावर चिकटवता येतील. तुम्हाला नक्षी काढायची असेल, मणी चिकटवायचे असतील तर ही सजावटही करू शकता. आता हे पंख तुम्हाला लॉलीपॉपच्या काडीवर चिकटवायचे आहेत. कौशल्य वापरून गम किंवा टेपने ते चिकटवा. अशाचप्रकारे तुम्ही वेगवेगळे आकार तयार करून लॉलीपॉपपासून सुंदर सुंदर कलाकृती तयार करू शकता.

## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) यंदाच्या ऑस्कर सोहळ्यातल्या सर्वोत्कृष्ट इंग्रजी चित्रपट कोणता?
२) ओझोनच्या थरामुळे सूर्याची कोणती किरणं पृथ्वीवर पोहोचत नाहीत?
३) रॉयटर्स ही कोणत्या देशाची वृत्तसंस्था आहे?
४) बेसबॉलच्या मैदानाला काय म्हणतात?
५) भारतातल्या कोणत्या राज्यात सर्वाधिक शहरं आहेत?
६) नाटोची स्थापना कधी झाली?
७) संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या कायमस्वरूपी सदस्य देशांची संख्या किती?
८) ऑस्ट्रेलियातलं बेटांवर वसलेलं राज्य कोणतं?
९) कोणत्याची पर्वतरांगेचा भाग नसलेला आफ्रिकेतला सर्वात उंच पर्वत कोणतहा?
१०) लॅटिन अमेरिकेतलं सर्वात मोठं शहर कोणतं?


उत्तर : १) ग्रीन बुक २) अतीनील किरणं ३) इंग्लंड ४) डायमंड ५) उत्तर प्रदेश ६) ४ एप्रिल १९४९ ७) ५ ८) टास्मानिया ९) माउंट किलिमांजारो १०) मेक्सिको सिटी



## खा बदाम आणि अक्रोड

व्हॉट्स न्यू?

छोट्यांनो, तुम्ही परीक्षेच्या तयारीला लागला असाल. अभ्यास जोरात सुरू असेल. भरपूर वाचलं तरी लक्षात राहात नाही असं तुम्हाला वाटतं का? चांगले गुण मिळवण्यासाठी वाचलेले धडे लक्षात राहायला हवे. अभ्यास नीट समजून घ्यायला हवा. मेंदू तल्लख करण्याचं काम काही पदार्थ करतात. सुकामेवा खाल्ल्यामुळे मेंदूला भरपूर पोषक घटक मिळतात. वाचलेलं लक्षात राहातं. त्यातही बदाम आणि अक्रोड खाल्ल्याने खूप लाभ मिळतात. बदामात प्रथिनं असतात. यामुळे मेंदूचं कार्य सुधारतं. प्रथिनांमुळे आपल्याला ऊर्जा तर मिळतेच शिवाय मेंदूच्या पेशींच्या दुरूस्तीचं कामही ते करतात. यामुळे आपली वैचारिक क्षमता वाढते. स्मरणशक्ती सुधारते.



बदामात अ जीवनसत्त्वही भरपूर प्रमाणात असतं. डोळ्यांच्या आरोग्यासाठी अ जीवनसत्त्व उपयुक्त ठरतं. दररोज तीन ते चार बदाम खाल्ल्याने आपली दृष्टी सुधारते. तुम्हाला चष्मा असेल तर बदाम खायला सुरूवात करा. प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठीही बदाम खायला हवे. सर्दी,खोकला,ताप यांसारख्या आजारांना लांब ठेवायचं असेल तर बदाम खा. तसंच हाडांच्या बळकटीसाठीही बदाम खायला हवे.


अक्रोड हा पदार्थही खूप पौष्टिक आहे. मेंदूसारखं दिसणारं अक्रोड कामही तसंच करतं. मेंदू तसंच हाडांच्या बळकटीसाठी अक्रोड खायला हवं. यात कॉपर, मॅंगनिज, मॅग्नशियम, पोटॅशियम, फॉस्फोरस, बायोटिन, ब जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं. यामुळे मेंदू तल्लख होतो. वाचलेलं नीट लक्षात राहतं. म्हणूनच अक्रोडाला ब्रेन फूड असंही म्हणतात. अक्रोडमधल्या ओमेगा ३ फॅटी ॲसिड्समुळे हृदयाला बळकटी मिळते.

## इथे वाहनांना नो एन्ट्री

फनी वर्ल्ड

दोस्तांनो, प्रदूषण ही आजची कळीची बाब आहे. दिल्लीमध्ये तर प्रदूषण कमी करण्यासाठी ऑड-इव्हन फॉर्म्युला वापरावा लागतोय. वाहनं प्रमाणाबाहेर वाढल्यामुळे सगळीकडेच प्रदूषण प्रचंड वाढलं आहे. चारचाकी वाहनांशिवाय आपलं कसं होणार, असं अनेकांना वाटत असलं तरी जगातल्या कित्येक देशांमध्ये आणि बेटांवर एकही वाहन नाही. कोणते आहेत हे देश? आणि कसा प्रवास करत असतील इथले लोकं? जाणून घेऊ या...

✻ कधी केनियातल्या लामू नावाच्या बेटावर गेलात तर तुम्हाला खेचरावरून फिरावं लागेल. या बेटावर एकही गाडी नाही. इथे वाहतुकीसाठी दोन ते तीन हजार खेचरांची मदत घेतली जाते.



✻ इटलीतल्या व्हेनिस शहरात बोटीनं किंवा चालत फिरावं लागतं. म्हणूनच हे शहर फारच सुंदर राहिलंय. व्हेनिसमध्ये ४०० पूल आहेत. हे पूल छोट्या छोट्या ११८ बेटांना जोडतात. युरोपमधलं हे छोटसं शहर कार फ्री म्हणून ओळखलं जातं.

✻ ग्रीसमधलं हायड्रा हे बेटही असंच आहे. घोडे, खेचरं आणि बोटीचा वापर करून येथे लोक प्रवास करतात. अत्यंत शांत आणि सुंदर असं हे ठिकाण आहे, वाहनांचा वापर नसल्यानं ते प्रदुषणमुक्त राहिलंय. इथे पायी फिरणारे अनेक लोक पहायला मिळतील.


✻ मोराक्कोतलं मदिना हे ठिकाण असंच अनोखं म्हणता येईल. इथल्या गल्ल्या इतक्या छोट्या आहेत की तिथून पायी चालण्याशिवाय पर्याय नाही. या गल्ल्यांमधून दुचाकी वाहनंही जाऊ शकत नाही. या शहरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

✻ आपल्या महाराष्ट्रात माथेरान या हिल स्टेशनवरही वाहनांना परवानगी नाही. येथे गेल्यावर पायी, घोड्यावर बसून, माणसांकडून ओढल्या जाणाऱ्या रिक्षानं फिरावं लागतं.

## बनावट की असली?

स्मार्ट टिप्स

'अँड्रॉइड' असो किंवा 'आयओएस' अशा दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्समध्ये बनावट म्हणजे फेक ॲप्सचा सुळसुळाट आहे. अशी ॲप्स डाउनलोड केल्यानंतर फोनमधला डाटा चोरला जाण्याची शक्यता असते. आपण डाउनलोड करत असलेलं कोणतं ॲप बनावट आहे हे कसं ओळखायचं हे जाणून घेऊ या.



✻ कोणतंही ॲप डाउनलोड करून घेण्याआधी त्याचा स्रोत म्हणजे सोर्स तपासून पाहा. अधिकृत वेबसाईटवरूनच ॲप्स डाउनलोड करा. गुगल किंवा ॲपल प्ले स्टोअरमधूनच ॲप्स डाउनलोड करा. ही दोन्ही प्ले स्टोअर्स ॲप्सची पडताळणी म्हणजे व्हेरिफिकेशन करत असतात. त्यामुळे ती व्हेरिफाईड आहेत की नाही याची खात्री करून घ्या. या दोन्ही प्ले स्टोअर्समध्ये बनावट ॲप्सही असतात. त्यामुळे आपण डाउनलोड करत असलेलं ॲप सुरक्षित असल्याची ख़ात्री करून घ्यायला विसरू नका.

✻ ॲपल तसंच गुगल प्ले स्टोअरवर ॲप्सबाबत रिव्ह्यू दिलेले असतात. ते आधी वाचून घ्या. बरेचदा नको असलेली ॲप्सही आपण डाउनलोड करत असतो. यामुळे आपला फोन स्लो होतो. अशा ॲप्सचे काहीच लाभ होत नाहीत. तसंच बनावट ॲप्समध्ये काही चुका नक्कीच आढळतील. त्यामुळे कोणतंही ॲप बारकाईने तपासून घ्या.

✻ प्रत्येक ॲप विकसित करण्यात डेव्हलपरची महत्त्वाची भूमिका असते. खऱ्या ॲपच्या डेव्हलपरची माहिती दिलेली असते. या डेव्हलपरची माहिती सोशल मीडिया किंवा वेबसाईटवर मिळू शकते. ॲपच्या डेव्हलपरची माहिती मिळत नसेल तर ते ॲप बनावट आहे असं समजावं आणि डाउनलोड करू नये.

## At a Glance

### शिक्षणासाठी परदेशात जाणारे विद्यार्थी

**केरळ :** केरळचे अर्थमंत्री के. एन. बालगोपाल यांनी मंगळवारी सांगितले की, उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणारे विद्यार्थी राज्यासाठी चिंतेचे कारण नसून जागतिकीकरण आणि परदेशी शिक्षणाच्या सुलभतेचे प्रतिबिंब आहे. मात्र, केरळमधील तरुणांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी आपल्या सीमेपलीकडे जाण्याची गरज भासणार नाही, ही राज्याची महत्त्वाकांक्षा आहे.

### संजय राऊत आमच्यासाठी महत्त्वाचे नाहीत

**नागपूर :** शिवसेना नेते संजय राऊत यांच्या वक्तव्याला उत्तर देण्याची गरज वाटत नाही, कारण राऊत आमच्यासाठी महत्त्वाचे नाहीत, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीतील घटक पक्षांसोबत युती करण्याऐवजी स्वबळावर लढवण्याची शिवसेनेची योजना आहे, या राऊत यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना ते बोलत होते.

### हापुडमध्ये काँग्रेस नेत्याचा अपघाती मृत्यू

**हापुड :** उत्तर प्रदेशातील बुलंदशहर रोडवरील आवासीय विकास कॉलनी चौकात मोटारसायकल आणि कारयांच्यात झालेल्या अपघातात एका काँग्रेस नेत्याचा मृत्यू झाला. सोमवारी सायंकाळी झालेल्या या अपघातात शहर काँग्रेस कमिटीचे सचिव मैनुद्दीन (३५) यांचे अपघाती निधन झाले. मैनुद्दीन तहसील चौराहा येथून मोटारसायकलवरून घरी परतत असताना हा अपघात झाला.

# भारताचे आता मिशन मौसम

## हवामान शास्त्र विभागाच्या १५० व्या स्थापना दिनी घोषणा


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय हवामान शास्त्र विभागाच्या १५० व्या स्थापना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी 'मिशन मौसम'चा शुभारंभ केला. प्रत्येक हवामान आणि हवामानाला सामोरे जाण्यासाठी देशाला 'स्मार्ट नेशन' बनविण्याच्या उद्देशाने 'मिशन मौसम' सुरू करण्यात आले आहे. राजधानी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित कार्यक्रमात भाग घेताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हवामान प्रतिरोधक आणि हवामान बदल अनुकूलनासाठी आयएमडी व्हिजन - २०४७ सादर केले. तसेच एक विशे, नाणे देखील जारी केले. हवामानाचा अंदाज, हवामान व्यवस्थापन आणि हवामान बदल कमी करण्याच्या योजनांचा या मोहिमेत समावेश आहे.

भारतीय हवामान शास्त्र विभागाच्या (आयएमडी) १५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना मोदी यांनी अत्याधुनिक हवामान निरीक्षण तंत्रज्ञान आणि प्रणाली विकसित करणे, उच्च-रिझोल्यूशन वातावरणीय निरीक्षणे, पुढील पिढीचे रडार आणि उपग्रह आणि उच्च कार्यक्षमतेचे संगणक कार्यान्वित करण्यासाठी 'मिशन मौसम' सुरू केले.

तत्पूर्वी, पंतप्रधानांनी आयएमडीच्या कामगिरीवर आधारित भारत मंडपम येथील प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आज आपण भारतीय हवामान खात्याची (आयएमडी) १५० वर्षे साजरी करत आहोत. आयएमडीने केवळ कोट्यवधी भारतीयांची सेवा केली नाही तर भारताच्या वैज्ञानिक प्रवासाचे प्रतीक बनले आहे. आज हवामान खाते अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहे. हे त्यांनी नमूद केले.





### मिशन हवामान काय आहे?

- मिशन मौसम हा भारतीय हवामान विभागाच्या अंदाज, मॉडेलिंग आणि माहिती प्रसार क्षमता वाढवण्यासाठी सुरू करण्यात आलेला महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. या मिशनच्या पहिल्या दोन वर्षांसाठी २ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. हवामान निरीक्षण, मॉडेलिंग आणि अंदाज सेवांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात येईल. त्याचा थेट फायदा कृषी, विमान वाहतूक, संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन, पर्यटन आणि आरोग्य यासारख्या प्रमुख क्षेत्रांना होईल. सरकारच्या निवेदनानुसार, मिशन मौसमचे उद्दिष्ट देशातील सर्व हवामान सेवा सुधारणे हा आहे. २०१२ मध्ये मिशन मान्सून लाँच केल्यानंतर भारताची हवामान अंदाज प्रणाली सुधारण्याच्या दिशेने हे दुसरे मोठे पाऊल असल्याचे मानले जाते. मिशन मान्सूनने लांब पल्ल्याच्या हवामान अंदाज सुधारण्यावर भर दिला.

### काय साध्य करणार...

- अत्याधुनिक हवामान निरीक्षण तंत्रज्ञान तसेच त्यासाठीची प्रणाली विकसित करणे, वातावरणीय निरीक्षण, अत्याधुनिक रडार आणि उपग्रह तसेच उच्च-कार्यक्षमतेचे संगणक कार्यान्वित करून अंदाजात अचुकता आणणे, हे याचे उद्दीष्ट आहे. हवामान आणि हवामान प्रक्रियेचे आकलन सुधारण्यावर देखील लक्ष केंद्रित करण्यात येईल. हवेच्या गुणवत्तेची माहितीही या अंतर्गत मिळेल.

### देखरेख कोण करणार?


- मिशन मौसमचे नेतृत्व पृथ्वी विज्ञान मंत्रालयाद्वारे वित्तपोषित तीन संस्था करणार आहेत:
- भारतीय हवामान शास्त्र विभाग (आयएमडी)
- भारतीय उष्णकटिबंधीय हवामान शास्त्र संस्था, पुणे
- नॅशनल सेंटर फॉर मीडियम रेंज वेदर फोरकास्टिंग, नोएडा

भारताला हवामानासाठी सज्ज आणि हवामान स्मार्ट करण्यासाठी आम्ही 'मिशन मौसम' सुरू केले आहे, असे मोदी म्हणाले. मिशन मौसम हवामान आणि हवामान प्रक्रियेचे आकलन सुधारण्यावर लक्ष केंद्रित करेल, हवेच्या गुणवत्तेची माहिती प्रदान करेल ज्यामुळे हवामान व्यवस्थापन आणि दीर्घकालीन हस्तक्षेपाची रणनीती आखण्यास मदत होईल. कोणत्याही देशाच्या आपत्ती व्यवस्थापन क्षमतेसाठी हवामानशास्त्र सर्वात महत्त्वाचा आधार देते. नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी हवामानशास्त्राची कार्यक्षमता वाढविण्याची गरज आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

ते म्हणाले की, विज्ञानातील प्रगती आणि त्याच्या पूर्ण क्षमतेचा वापर करण्याची क्षमता एखाद्या देशाच्या जागतिक प्रतिष्ठेला आकार देण्यासाठी आधारस्तंभ म्हणून काम करते. भूकंपासाठी चेतावणी देणारी यंत्रणा विकसित करण्याची गरज असून शास्त्रज्ञ आणि संशोधकांनी या दिशेने काम केले पाहिजे, असे मोदी म्हणाले.

हवामान तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे भारताच्या आपत्ती व्यवस्थापन क्षमतेत लक्षणीय सुधारणा झाली असून, ती केवळ देशासाठीच नव्हे तर जागतिक समुदायासाठीही फायदेशीर ठरली आहे, असे पंतप्रधान म्हणाले. आज आमची फ्लॅश फ्लड गाईडन्स सिस्टीम नेपाळ, भूतान, बांगलादेश आणि श्रीलंकेसह शेजारील देशांना महत्त्वाची माहिती पुरवते, असे मोदी म्हणाले. कोणत्याही आपत्तीचा फटका बसलेल्या शेजारच्या देशांना मदत करणारा भारत हा पहिला देश ठरला आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

# क्यु आर अटेंडन्सी पुन्हा ऐरणीवर



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मध्यंतरीच्या क्यू आर बेस अटेंडन्सी हजेरीच्या विषयावरून शिक्षकांनी रान पेटवलं होत. शिक्षकांच्या या आक्रमक भूमिकेमुळे काहीसा मागे पडलेला 'क्यु आर' अटेंडन्सी हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. नुकतेच जिल्हा परिषद प्रशासनाने सर्व गटविकास अधिकारी यांना पत्र काढून शिक्षक, मुख्याध्यापकांसह आरोग्य, ग्रामपंचायत, महिला व बालकल्याण इत्यादी विभागातील कर्मचाऱ्यांची हजेरीची नोंद संबंधित प्रणालीवरच घ्यावी, तसेच जानेवारीचे मासिक वेतन देखील याच आधारे काढण्याच्या सूचना केल्या आहेत. याशिवाय कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करावी, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा प्रशासन विरोधात कर्मचारी असा संघर्ष पेटण्याची शक्यता आहे.

**तंत्रज्ञान**

क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी, यात वैद्यकिय सेवेतील अधिकारी कर्मचारी, पशुवैद्यकिय सेवेतील अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक, ग्रामसेवक, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनिस आदी नेमून दिलेल्या कार्यालयात नियमित उपस्थित असतात किंवा कसे याबाबतची अचुक माहिती जिल्हा व तालुका प्रशासनास तत्काळ उपलब्ध होण्यासाठी, जिल्हा परिषदेने क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी, कर्मचारी यांच्या दैनंदिन उपस्थितीची अचुक नोंद करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांचे संकल्पनेतून क्यू आर बेस अटेंडन्सी सिस्टीम ही मोबाईल व संगणकीय प्रणाली तयार केली आहे.

**ग्रामसेवक ग्रामपंचायतीत; तर डॉक्टर दवाखान्यातच दिसतील!**

या प्रणालीचा वापर म्हणजे नियुक्तीच्या कार्यालयात क्यू आर कोड बसवला जाणार आहे. आपल्या मोबाईलमधील ॲपव्दारे तो स्कॅन केल्यानंतरच हजेरी लागणार. याशिवाय कार्यालयात येताना आणि बाहेर पडतानाही क्यू आर कोड स्कॅन करणे बंधनकारक असणार आहे. बहुतेक तक्रारी असलेले ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी, पशुवैद्यकीय कर्मचारी मात्र या प्रणालीतून पूर्णवेळ आपापल्या कार्यालयात पहायला मिळणार आहे. यातून जनतेची प्रशासकीय कामे रखडणार नाहीत.

# भारताबद्दलच्या टिपणीवरून झुकेरबर्ग अडचणीत

## संसदीय समिती समन्स बजावणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** २०२४ मध्ये झालेल्या भारतातील सार्वत्रिक निवडणुकांबाबत फेसबुकचा संस्थापक मार्क झुकेरबर्ग याने केलेल्या वक्तव्यावरून सोशल मीडिया कंपनी मेटाला संसदीय समितीकडून समन्स मिळण्याची शक्यता आहे. मार्क झुकेरबर्ग असा म्हणाला होता की, कोविडनंतर २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीत भारतासह अनेक देशांची सरकारे पडली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी झुकेरबर्ग याचा दावा खोटा असल्याची टीका केली आहे.

भाजप खासदार आणि दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान समितीचे अध्यक्ष निशिकांत दुबे म्हणाले की, चुकीची माहिती पसरवल्याबद्दल मेटाला समन्स बजावले जाईल. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाविषयी चुकीची माहिती दिल्याने भारताची प्रतिमा मलीन करण्याचे काम झुकेरबर्ग याने केले आहे. त्याच्या या चुकीबद्दल मेटाने संसदेची आणि इथल्या जनतेची माफी मागावी, अशी मागणीही दुबे यांनी केली आहे.

१० जानेवारी रोजी एका पॉडकास्टमध्ये झुकेरबर्ग असे म्हणाला होता की, कोविड महामारीमुळे जगभरातील विद्यमान सरकारांवरील विश्वास कमी झाला आहे. यासंदर्भात त्यांनी भारताचे चुकीचे उदाहरण दिले. २०२४ हे वर्ष जगभरातच निवडणुकीचे वर्ष होते आणि भारतासह जगभरात ज्या ज्या देशांमध्ये निवडणुका झाल्या, तेथील विद्यमान सरकारे प्रत्येक निवडणुकीत पराभूत झाली. जागतिक पातळीवर महागाई असो वा आर्थिक संकट, हे यामागचे मोठे कारण होते. या सरकारांनी ज्या प्रकारे कोव्हिडशी लढा दिला, त्याचाही फटका त्यांना बसला. जनतेचा लोकशाही संस्थांवरील विश्वासही कमी झाला आहे, असा दावा त्याने केला होता. तथापि, भारतात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने सत्ता कायम राखण्यात यश मिळवले आहे.



**अश्विनी वैष्णव यांचा प्रतिहल्ला**

झुकेरबर्गच्या वक्तव्याला उत्तर देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आहे की, जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताने २०२४ च्या निवडणुकीत ६४ कोटींहून अधिक मतदारांसह सहभाग घेतला. भारतातील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआवर विश्वास कायम ठेवला. कोविडनंतर २०२४ च्या निवडणुकीत भारतासह बहुतांश विद्यमान सरकारे पराभूत झाल्याचा झुकेरबर्ग यांचा दावा तथ्यात्मकदृष्ट्या चुकीचा आहे. देशातील ८० कोटी जनतेला मोफत अन्न, जगातील सर्वात मोठे २.२ अब्ज लसीकरणाचे डोस आणि कोविड काळात, जगभरातील देशांना मदत करणारा तसेच सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारत पुढे आला. पंतप्रधान मोदी यांचा निर्णायक तिसरा कार्यकाळ सुशासन आणि लोकांच्या विश्वासाची साक्ष आहे, असे वैष्णव यांनी नमूद केले आहे.

# कांदा दरात घसरण सुरूच

## लासलगाव बाजार समितीत लिलाव पाडले बंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लासलगाव:** गेल्या महिन्याभरापासून कांदा दरातील घसरण सुरूच असून, सरासरी दर १४०० रुपयांपर्यंत खाली आल्याने दर सुधारण्यासाठी केंद्राने कांद्यावरील 20 टक्के निर्यातशुल्क हटविण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने आक्रमक पवित्रा घेत सोमवारी लासलगाव बाजार समितीत कांदा लिलाव बंद पाडले. तसेच निर्यातशुल्क न हटविल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे दिला आहे.

लासलगाव बाजार समितीत सोमवारी सकाळच्या सत्रात लिलाव सुरू होताच कांदादरात मोठी घसरण झाली. नवीन लाल कांद्याला कमीत कमी ७००, सरासरी १८२५, तर जास्तीत जास्त २३३२ रुपये प्रतिक्विंटल दर मिळला. त्यामुळे राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष दिघोळे यांनी केंद्र सरकारने कांद्यावरील सध्या लागू केलेले २० टक्के निर्यातशुल्क तत्काळ रद्द करून शून्य टक्के करावे व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी करत घोषणाबाजी करत लिलावाला विरोध केला. यावेळी दिघोळे यांनी केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातशुल्क न हटविल्यास राज्यव्यापी रस्ता रोको, रेल रोको आंदोलनाबरोबरच बाजार समित्यांमध्ये लिलाव बंद पाडण्याचा इशारा दिला. यावेळी संघटनेचे जिल्हा युवक अध्यक्ष केदारनाथ नवले, चांदवड तालुकाध्यक्ष दत्तू गांगुर्डे यांच्यासह कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. साधारण अर्धा तासानंतर कांद्याचे लिलाव पूर्ववत सुरू झाले.

लाल कांद्याचे बफर उत्पादन

खरीप हंगामात लाल कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाल्याने काही दिवसांपासून कांद्याचे दर प्रतिक्विंटल ३००० ते ३५०० रुपयांनी घसरले आहेत. यामुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. परिणामी, शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

# आतिशी यांचे आडनाव उघड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**नवी दिल्ली :** विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी जनतेकडून देणग्या मागणाऱ्या दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांना त्यांच्या संपत्तीची माहिती मिळाली आहे. याशिवाय त्यांच्या नावाने सुरू असलेला संभ्रमही दूर करण्यात आला आहे. आतिशी यांचे पूर्ण नाव आतिशी मार्लेना असल्याचे निवडणूक प्रतिज्ञापत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांपासून त्यांच्या नेम प्लेटवर फक्त आतिशी असा उल्लेख करण्यात येत होता. सोशल मीडियावर त्या आपलं आडनावही लिहीत नाहीत. आतिशी यांनी आपली एकूण संपत्ती ७६.९३ लाख रुपये असल्याचे जाहीर केले आहे.

आतिशी यांनी प्रतिज्ञापत्रात असे म्हटले आहे की, त्यांच्याकडे ७६,९३,३७४.९८ रुपयांची जंगम मालमत्ता आहे. यामध्ये ३० हजार रुपयांची रोकड आणि एक लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आहेत. उर्वरित ७५ लाख रुपये बचत बँक खाते आणि एफडीच्या स्वरूपात आहेत. मुख्यमंत्र्यांनी आपल्या नावावर स्थावर मालमत्ता नसल्याचे म्हटले आहे. प्रतिज्ञापत्रानुसार आतिशी यांच्या नावावर घर आणि गाडी नाही.

आतिशी मार्लेना म्हणाल्या की, २०२३-२४ मध्ये त्यांचे एकूण उत्पन्न ९,६२,८६० रुपये आणि २०२२-२३ मध्ये ४,७२.६८० रुपये होते. २०20 च्या विधानसभा निवडणुकीत कालकाजी मतदारसंघातून निवडणूक लढवताना त्यांनी प्रतिज्ञापत्रात आपली एकूण संपत्ती १ कोटी ४१ लाख २१ हजार ६६३ रुपये असल्याचे जाहीर केले होते. मात्र, त्यानंतर त्यात पतीच्या मालमत्तेचाही समावेश होता. यावेळी त्यांनी केवळ वैयक्तिक मालमत्ता जाहीर केली आहे.

## खबरदारी

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**लॉस एंजेलिस** कॅलिफोर्नियाच्या लॉस एंजेलिस येथे वणव्याने उडालेल्या भडक्याच्या पार्श्वभूमीवर शेजारील मॅंडेव्हिल कॅनियन येथे अशा पद्धतीने खबरदारी घेण्यात आली आहे

# तामिळनाडूत रेल्वे दुर्घटना टळली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** तामिळनाडूत मंगळवारी सकाळी मोठी रेल्वे दुर्घटना टळली. पुद्दुचेरीला जाणाऱ्या मेमू (मेनलाइन इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट) गाडीचे डबे रुळावरून घसरले. ही घटना विल्लुपुरमजवळ घडली. लोको पायलटला ते दिसल्याने मोठा अनर्थ टळला आणि त्यांनी तात्काळ गाडी थांबवली. कोणतीही जीवितहानी झाली नसून तीन तासात रेल्वे सेवा पूर्ववत करण्यात आली. चौकशी पूर्ण झाल्यानंतरच अपघाताचे कारण स्पष्ट होईल, असे त्यांनी सांगितले. या घटनेच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

विल्लुपुरम-पुद्दुचेरी ट्रेन सुमारे ५०० प्रवाशांना घेऊन पहाटे ५.२५ वाजता विल्लुपुरमहून निघाली. गाडी वळण ओलांडत असताना त्याचे डबे रुळावरून घसरले आणि लोको पायलटने ताबडतोब गाडी थांबवली. अशाप्रकारे लोको पायलटच्या समजूतदारपणामुळे मोठी दुर्घटना टळली. या अपघातामुळे विल्लुपुरम मार्गावरील रेल्वे सेवा सकाळी साडेआठवाजेपर्यंत विस्कळीत झाली होती. विल्लुपुरम-पुद्दुचेरी मेमू ही कमी अंतराची गाडी असून ती सुमारे ३८ किमी चे अंतर पार करते.

विशेष म्हणजे हिवाळ्यात दाट धुक्यामुळे गाड्यांच्या वेगाला ब्रेक लागला आहे. राजधानी दिल्लीत मंगळवारी सकाळी दाट धुके होते, ज्यामुळे दृश्यमानता शून्य झाली आणि रेल्वे सेवा विस्कळीत झाली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी सहा वाजेपर्यंत एकूण ३९ गाड्या उशिराने धावत होत्या. काही गाड्या ३० मिनिटे, तर काही चार तास उशिराने धावत होत्या.

# उत्तर भारतात थंडीची लाट कायम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तर भारतातील बहुतांश राज्यांमध्ये थंडीची लाट आहे. तसेच, येत्या काही दिवसांत ही थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. त्याचवेळी मध्य भारतात १५ आणि १६ जानेवारीला पावसाचा अंदाज भारतीय हवामान शास्त्र विभागाने वर्तवला आहे. यासोबतच उत्तर भारतात पुढील काही दिवस दाट धुक्याची स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे.

**हवामान**

गेल्या २४ तासांत पश्चिम मध्य प्रदेशात तुरळक ठिकाणी तर पूर्व राजस्थानात तुरळक ठिकाणी थंडीची लाट जाणवली. पूर्व उत्तर प्रदेश, पश्चिम उत्तर प्रदेश, दिल्ली, राजस्थान आणि हिमाचल प्रदेशामध्ये दाट धुके पसरल्याने दृश्यमानता ५० मीटरपेक्षा कमी झाली. जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये १५-१६ तारकेला बर्फवृष्टी आणि पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पंजाब, हरयाणा, चंदीगड, राजस्थान आणि उत्तर प्रदेशाच्या काही भागातही पावसाची शक्यता आहे. उत्तराखंड, बिहार, झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये १६ जानेवारीपर्यंत दाट धुके कायम राहणार आहे. पुढील तीन दिवसांत वायव्य भारतात किमान तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे.

# ॲग्रो हब आराखडा तयार करुन सादर करा -फडणवीसांचे निर्देश

**शेती**

**सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरुपी उभारण्यात येणाऱ्या व्यवस्थेचे निकष ठरवावे. राज्यातील चारही विभागांत उभारण्यात येणाऱ्या 'ॲग्रो लॉजिस्टीक हब'चा प्रस्ताव सादर करावा. कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळ हा उत्तम पर्याय आहे. त्यासाठी जास्त मागणीही आहे. त्यामुळे या चाळींची संख्या वाढवावी," आदी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** "महाराष्ट्राची भाग्यरेषा' अशी ओळख असलेल्या समृद्धी महामार्गालगत 'ॲग्रो हब' उभारले जाणार आहेत. 'मॅग्नेट' प्रकल्पाअंतर्गत ही कामे तत्काळ पूर्ण करावीत. या ठिकाणी सर्व सोयीसुविधा उभाराव्यात. या 'ॲग्रो हब'साठीचा आराखडा तयार करून सादर करावा,' असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले.

सोयाबीनची खरेदी केली जाते. ही खरेदी कोणत्याही अडथळ्याशिवाय होण्यासाठी विभागाने कायमस्वरुपी यंत्रणा उभारावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. यावेळी पणनमंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, पर्यटनमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मेघना साकोरे-बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांच्यासह विविध विभागांचे प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव, सचिव उपस्थित होते.



पुढील वर्षीपासून राज्यात नोव्हेंबरमध्ये सुरू होणाऱ्या सोयाबीन खरेदीसाठीची तयारी ऑक्टोबरमध्ये पूर्ण करण्याच्या सूचना देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "शेतकऱ्यांची नोंदणीही ऑक्टोबरमध्ये पूर्ण करावी. सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरुपी उभारण्यात येणाऱ्या व्यवस्थेचे निकष ठरवावे. त्यामध्ये सर्व सोयीसुविधांचा अंतर्भाव असावा. कोणत्याही अडचणीशिवाय सोयाबीन खरेदी सुरू राहिली पाहिजे, अशी यंत्रणा उभी करावी. राज्यातील चारही विभागांत उभारण्यात येणाऱ्या 'ॲग्रो लॉजिस्टीक हब'चा प्रस्ताव सादर करावा. कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळ हा उत्तम पर्याय आहे. त्यासाठी जास्त मागणीही आहे. त्यामुळे या चाळींची संख्या वाढवावी," आदी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

नवी मुंबई येथे 'महा बाजार' उभारण्याचे नियोजन असल्याची माहिती पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी दिली. हा बाजार आंतरराष्ट्रीय दर्जाचा असणार असून किमान २०० ते २५० एकर जागेमध्ये हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. तसेच राज्यातील प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती उभारण्यात येणार आहे.




## बुमराहला आयसीसीचा डिसेंबरमधील सर्वोत्तम खेळाडू म्हणून घोषित

बुमराहने ऑस्ट्रेलियाच्या पॅट कमिन्स आणि दक्षिण आफ्रिकेच्या डेन पॅटरसनला मागे टाकत हा पुरस्कार पटकावला आहे. डिसेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत बुमराहने १४.२२ च्या अप्रतिम गोलंदाजीच्या सरासरीने तब्बल २२ विकेट्स घेतल्या होत्या. भारताला एकही सामना जिंकता आला नसला तरी दोन सामने गमावले तरी बुमराहची कामगिरी उल्लेखनीय ठरली.

# बीसीसीआय निर्बंधाने खेळाडूंवर किंक्रांत

## पराभव बीसीसीआयच्या जिव्हारी; खेळाडू- प्रशिक्षकांविरोधात कठोर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर बीसीसीआय टीम इंडियातील खेळाडू आणि प्रशिक्षकांना कठोरता दाखवणार असून कडक निर्बंध लागू करण्याच्या तयारीत आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजेच बीसीसीआय आपल्या खेळाडूंवर सर्व प्रकारचे निर्बंध घालण्याचा विचार करत आहे. विचारात घेतलेले काही नियम कालबाह्य आहेत. उदाहरणार्थ, मोठ्या मालिका किंवा स्पर्धांदरम्यान पत्नी किंवा कुटुंबीय क्रिकेटपटूंसोबत राहणार नाहीत. हा नियम बीसीसीआयने कोविड- १९ पूर्वी लागू केला होता. परंतु, नंतर तो काढून टाकण्यात आला.

इंग्लंडविरुद्ध जवळपास दोन महिने चालणाऱ्या कसोटी मालिकेसाठी बीसीसीआय काही नवे आणि जुने नियम लागू करू शकते. खेळाडूंसाठी सर्वात मोठे निर्बंध म्हणजे ते ४५ दिवस किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीच्या स्पर्धा किंवा मालिकेदरम्यान आपल्या कुटुंबाला



एकत्र ठेवू शकत नाहीत. पत्नी किंवा कुटुंबीय जास्तीत जास्त दोन आठवडे खेळाडूंसोबत राहू शकतात. टूर किंवा इव्हेंट छोटा असेल तर कुटुंब आणि जोडीदार एकाच हॉटेलमध्ये सात दिवसांपेक्षा जास्त थांबणार नाहीत.

याशिवाय, आता सर्व खेळाडू टीम बसमधून प्रवास करतील, असे बोर्डाने सर्वांना स्पष्ट केले आहे. यामुळे संघात एकजूट येईल. कोणताही मोठा खेळाडू वेगळा प्रवास करणार नाही. टीमच्या प्रमुखाच्या पर्सनल मॅनेजरला टीम बस किंवा टीमच्या मागे धावणाऱ्या बसमध्ये प्रवास करता येणार नाही आणि त्याला व्हीआयपी बॉक्सची सुविधाही दिली जाणार नाही. याचबरोबर विमानात १५० किलोपेक्षा जास्त सामान घेऊन गेल्यास त्याची किंमत त्यांना स्वत: मोजावी लागेल, यावरही बंदी घालण्यात आली आहे.

**बीसीसीआयचे निर्बंध**

जर स्पर्धा किंवा मालिका 45 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त काळ चालली तर कुटुंबाला केवळ 14 दिवस खेळाडूंसोबत राहण्याची परवानगी असेल. संपूर्ण स्पर्धा किंवा मालिकेदरम्यान पत्नीही खेळाडूंसोबत राहणार नाहीत.

जर दौरा 45 दिवस किंवा त्यापेक्षा कमी असेल तर केवळ 7 दिवस खेळाडूला त्याच्या कुटुंबासोबत ठेवू शकतात. सर्व खेळाडूंना टीम बसमधून प्रवास करावा लागेल.

मुख्य प्रशिक्षकाचे पर्सनल मॅनेजर टीम बसमध्ये प्रवास करणार नाहीत. व्हीआयपी बॉक्सलाही परवानगी नाही. जर खेळाडूंचे सामान १५० किलोपेक्षा जास्त असेल तर बीसीसीआय अतिरिक्त बॅगेज फी देणार नाही.आता टीम इंडियाचा सामना इंग्लंडशी ऑस्ट्रेलियाविरोधातील लाजिरवाण्या पराभवानंतर भारतीय संघ येत्या २२ जानेवारीपासून इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. नुकतीच बीसीसीआयने इंग्लंडविरुद्ध टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली होती. या मालिकेतून भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शामी पुनरागमन करणार आहे. इंग्लंडविरुद्ध टी-२० मालिकेसाठी भारतीय संघ:

सूर्यकुमार यादव (कर्णधार), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, रिंकू सिंह, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल (उपकर्णधार), हर्षित राणा, अर्शदीप सिंग, मोहम्मद शामी, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, वॉशिंग्टन सुंदर, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक).

२३ व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे बारामती येथे आयोजन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 23 वी छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा 2024- 25' चे 15 ते 19 जानेवारी 2025 या कालावधीत रेल्वे मैदान, बारामती येथे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी दिली आहे.

ऑलिम्पिकपटू स्वर्गीय खाशाबा जाधव यांचा जन्मदिन 'राज्य क्रीडा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली 15 जानेवारी रोजी सांयकाळी 6 वा. उद्घाटन होणार आहे, यावेळी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे.राज्यातील कबड्डी खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत खेळण्याची संधी प्राप्त व्हावी, कबड्डी क्रीडाप्रेमी, प्रेक्षकांना दर्जेदार खेळाडूंचा खेळ व त्यांचे कौशल्य बघता यावे, याकरीता राज्य शासनामार्फत राज्यस्तरीय पुरुष व महिलांसाठी 'छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धे'चे आयोजन करण्यात येते. बारामती शहर व परिसरात कबड्डी खेळाची विविध अद्ययावत प्रशिक्षण केंद्रे असून यामधून विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू घडलेले आहेत. बारामती शहराला सन 2009-10 व आता दुसऱ्यांदा या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा बहुमान मिळाला आहे.

# चेस फेस्टिवल बुद्धिबळ स्पर्धेस अत्यंत उत्साहाने सुरुवात




**पुणे :** अभिजीत चेस अकॅडमी ची मिनी ग्रुप आणि ओपन चेस टूर्नामेंट - २०२५ पुण्यातील दादासाहेब दरोडे हॉल , आगरकर रस्ता ,बी. एम. सी.सी. जवळ, शिवाजीनगर , पुणे - ४ येथे ए. सी.ए. चेस फेस्टिवल बुद्धिबळ स्पर्धेस अत्यंत उत्साहाने सुरुवात झाली. या मिनी ग्रुप व खुल्या स्पर्धेत जवळपास ३५० खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला आहे. त्यात ७५ पेक्षा अधिक फिडे आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडूंचा समावेश आहे.सदर स्पर्धेमध्ये एकूण १ लाख रुपयांची रोख पारितोषिके ठेवण्यात आलेली आहेत. ही स्पर्धा ८,१०,१२,१४ वर्षांखालील व खुला अशा वेगवेगळ्या गटांमध्ये खेळली जात आहे. स्पर्धेमध्ये चौथ्या फेरीच्या शेवटी ८ वर्षांखालील गटात पार्थ शिंदे,पर्व सांगळे - ४ गुण प्रत्येकी, १० वर्षांखालील गटात सर्वज्ञ बालगुडे,आयुष जगताप,विहान शाह,तीर्थ कोद्रे- ४ गुण प्रत्येकी, १२ वर्षांखालील गटात राऊथु नायडू - ४ गुण, १४ वर्षांखालील गटात भुवन कोन्नूर, आरव भोला - ४ गुण प्रत्येकी, खुला गट-मिहीर सरवदे, गौरव बाक्लीवाल,अर्णव कदम,केवल निर्गुण - ४ गुण प्रत्येकी प्राप्त करत पुढच्या फेरीत प्रवेश केला.

# श्लोक हिंगे, श्रेयस चौतमहल, हृद्वी लिमकर यांना विजेतेपद



**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए मानांकन आदित्य - कैफी टेनिस अकादमी ब्रॉन्झ सिरिज टेनिस 2025 स्पर्धेत श्लोक हिंगे, श्रेयस चौतमहल, हृद्वी लिमकर यांनी आपापल्या गटातील प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले. मिलेनियम नॅशनल स्कूल, कर्वेनगर येथील टेनिस कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत ८ वर्षाखालील मुलांच्या गटात अंतिम फेरीत बिगरमानांकित श्लोक हिंगेने तिसऱ्या मानांकित शौर्य कलवागट्टूचा ७-५ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. १० वर्षांखालील मुलांच्या गटात अंतिम लढतीत तिसऱ्या मानांकित श्रेयस चौतमहल याने दुसऱ्या मानांकित पलाश रूचंदानीचा ७-१ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. याच मुलींच्या गटात अंतिम फेरीच्या सामन्यात अव्वल मानांकित हृद्वी लिमकर हीने अन्वी साहूचा ७-० असा एकतर्फी पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली. हृद्वी हि विद्या प्रतिष्ठान सीबीएससी शाळेत चौथी इयत्तेत शिकत असून बारामती लॉन टेनिस क्लब जिल्हा क्रिडा संकुल येथे प्रशिक्षक अविनाश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.



# कोतवाल युनिकॉर्न,नॉक ९९ पुणेरी बाप्पा, सुप्रीम बेल्फिन्स टायगर्स संघांचे विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या वतीने अकराव्या पीवायसी- पुसाळकर प्रीमियर लीग क्रिकेट 2025 स्पर्धेत कोतवाल युनिकॉर्न,नॉक 99पुणेरी बाप्पा, सुप्रीम बेल्फिन्स टायगर्स, बदामीकर स्टार्स,लाइफसायकल स्नो लेपर्ड्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

पीवायसी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत रौनक टिळक(48धावा) याने केलेल्या सुरेख फलंदाजीच्या जोरावर कोतवाल युनिकॉर्न संघाने बेलवलकर बॉबकॅट्स संघावर 2 धावांनी विजय मिळवत पहिला विजय नोंदवला. दुसऱ्या लढतीत आत्मन बागमार(45धावा) याने केलेल्या उत्कृष्ट फलंदाजीच्या जोरावर नॉक 99पुणेरी बाप्पा संघाने जीएम टायफून्स संघाचा 4 गडी राखून पराभव करत पहिल्या विजयाची नोंद केली. काल रात्री उशिरा झालेल्या लढतीत इशांत रेगे नाबाद 68 व 1-7) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर सुप्रीम बेल्फिन्स टायगर्स संघाने जीएम टायफून्स संघाचा 37धावांनी पराभव करून शानदार सुरुवात केली. सिद्धार्थ बदामीकरच्या नाबाद 56 धावांच्या खेळीच्या जोरावर बदामीकर स्टार्स संघाने ए अँड ए शार्क्स संघाचा 11 धावांनी पराभव केला. अक्षय ओक नाबाद 30 धावांच्या जोरावर लाइफसायकल स्नो लेपर्ड्स संघाने चिताज संघावर 16 धावांनी विजय मिळवला. ओजस साबडे(नाबाद 68)याने केलेल्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर बेलवलकर बॉबकॅट्स संघाने ट्रूस्पेस नाईट्स संघावर 29धावांनी विजय मिळवला.

# निनाद, अथर्व, सुदीप उपांत्य फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** निनाद कुलकर्णी, अथर्व खिस्ती, सुदीप खोराटे यांनी पीवायसी एचटीबीसी-अमनोरा कप जिल्हा सुपर-५०० मानांकन बॅडमिंटन स्पर्धेत आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करून पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

पीवायसी हिंदू जिमखान्याच्या बॅडमिंटन कोर्टवर ही स्पर्धा सुरू आहे. पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत नवव्या मानांकित निनाद कुलकर्णीने प्रद्युम्न खंदाडेवर २१-१३, २१-१७ असा, तर चौथ्या मानांकित अथर्व खिस्तीने सुजल लखारीवर २१-१६, २१-१५ असा विजय मिळवला. यानंतर सुदीप खोराटेने विवेक चंद्रवंशीचे आव्हान २१-९, २१-९ असे सहज परतवून लावले. दुस-या मानांकित वसीम शेखला उपांत्यपूर्व फेरीचा अडथळा पार करण्यास फारसे कष्ट पडले नाहीत. त्याने दिग्विजयसिंह राजपूतवर २१-१९, २१-१७ असा विजय मिळवला. स्पर्धेतील १७ वर्षांखालील मुलांच्या उप-उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत अग्रमानांकित अर्हम रेदासानीने पाचव्या मानांकित श्रेयस मासळेकरला २१-१६, २१-१६ असे नमविले. यानंतर विहान कोल्हाडेने सातव्या मानांकित अजिंत्य जोशीला २२-२०, २१-१९ असा पराभवाचा धक्का दिला. चौथ्या मानांकित विहान मूर्तीने चिन्मय फणसेला २१-८, २२-२० असे नमविले.

सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीग 2024-25

# पहिल्या दिवशी तब्बल 33 गोल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीग 2024-25 मध्ये पहिल्या दिवशी तब्बल 33 गोल झाले. चार सामने ड्रॉ (अनिर्णित) झाले. तसेच अनेक सामन्यांचे निकाल एकतर्फी लागले.

यजमान सेंट व्हिन्सेंट मैदानावर शनिवारी सुरू झालेल्या हॉकी लीगचा प्रारंभीचा दिवस लोयोला 'ब' संघाने गाजवला. त्यांनी सेंट व्हिन्सेंटच्या एचएसला 12-0 अशा मोठ्या फरकाने पराभूत केले. सर्वाधिक गोलांची नोंद झालेला हा सामना होता. मार्क दासने 5 गोल करत विजयात मोलाचा वाटा उचलला. स्कायलर एस आणि साईराज शिंदेने प्रत्येकी 3 आणि राजवीर शिंदेने एक गोल करताना त्याला चांगली साथ दिली.

त्यानंतर सेंट पॅट्रिक्स 'अ' संघाने शौर्य (5 गोल) आणि ऑस्टिनच्या (3 गोल) सर्वोत्तम कामगिरीच्या जोरावर दस्तूरवर 8-0 असा विजय मिळवला. लोयोला 'अ' संघाने ओर्नेलास एचएसला त्याच फरकाने पराभूत केले. लोयोला 'अ' संघाकडून अहिल पठाण (३ गोल), इशान शेलार आणि शौर्य मोजे (प्रत्येकी २) आणि अमेय गरडने एक गोल केला. दस्तूरवर 5-0 अशी मात करत सेंट व्हिन्सेंटच्या 'ब' संघाने त्यांचा पहिला विजय नोंदवला. अथर्व बोराटे, राजवीर सिंग, शौर्य सेठिया, प्रणव गंडले, तनुष तुपेने प्रत्येकी एका गोलसह छाप पाडली.

अन्य सामन्यांत, सेंट व्हिन्सेंट 'अ' आणि सेंट पॅट्रिक्स 'ब' तसेच पॅट्रिक्स 'अ' आणि लोयोला 'ब' यांच्यातील लढत गोलशून्य बरोबरीत सुटली.

# मेट्रो क्रिकेट क्लबची; क्लब ऑफ महाराष्ट्रवर मात



**पुणे :** पाथ-वे फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या पाचव्या दोशी इंजिनिअर्स करंडक आंतरक्लब वरिष्ठ निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत गट साखळी फेरीत ब गटात वरुण चौधरी(4-23 व नाबाद 20) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर मेट्रो क्रिकेट क्लब संघाने क्लब ऑफ महाराष्ट्र संघाचा 4 गडी राखून पराभव करत विजयी सलामी दिली. नेहरू स्टेडियम येथील क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत मेट्रो क्रिकेट क्लबच्या वरुण चौधरी(4-23), रिद्धेश भुरूक(2-20), नारायण डोके(2-30),आदर्श बोथरा(1-15) यांनी केलेल्या अचूक गोलंदाजीपुढे क्लब ऑफ महाराष्ट्र संघाचा डाव 33.3 षटकात सर्वबाद 155 धावावर संपुष्टात आला. यात अभिनव तिवारी 43, विराज दारवटकर 28, आदिल 19, ओंकार मोहिते 14, आराध्या सिंग 12 यांनी धावा केल्या.

## २५०० हून अधिक विद्यार्थी

# अभाविपची विवेकानंद रन मॅरेथॉन उत्साहात संपन्न



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त व त्याचसोबत अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचे विचार जनसामान्यात पोहोचवण्यासाठी, सर परशुरामभाऊ महाविद्यालयात 'विवेकानंद रन' मॅरेथॉन चे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉन चे उद्घाटन अभाविपचे राष्ट्रीय महामंत्री 'डॉ.वीरेंद्र सिंह सोलंकी' यांनी केले. यावेळी पश्चिम महाराष्ट्र प्रांतमंत्री श्री अथर्व कुलकर्णी, प्रांत खेलोभारत संयोजक पराग कुलकर्णी, पुणे महानगर अध्यक्ष प्रा.डॉ.प्रगती ठाकूर, पुणे महानगरमंत्री हर्षवर्धन हरपुडे, , महानगर खेलोभारत संयोजक प्रसाद सोनवणे हे सर्व उपस्थित होते.

या मॅरेथॉनमध्ये १० किलोमीटरची रन, स्वामी विवेकानंदांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त, ५ किलोमीटरची रन जिजाऊंच्या ४२७ व्या जयंतीनिमित्त व ३ किलोमीटरची रन अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त आयोजित केलेल्या होत्या. यात अनेक महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. या मॅरेथॉनमध्ये २५०० हून अधिक विद्यार्थी व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवला ज्यात सर्वच वयोगटातील लोक सहभागी होते. युवा पिढीत निरोगी जीवनशैली वाढावी व त्याचबरोबर व्यसनाधीनतेच्या वृत्तीला आळा बसावा या हेतूने ह्या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले

सर्व उत्पादनांवर १५% सुट
१३० हून अधिक उत्पादनांची विस्तृत शृंखला
Since 1974
राज मसाले
CELEBRATING 50 YEARS OF TASTE & PURITY
राज मसाले ची सर्व उत्पादने मिळण्याची सर्व ठिकाणे

| | |
|---|---|
| **Bharti Enterprises** 629, Govind Halwai Chowk, Opp. Ranka Jewelers, **Raviwar Peth, Pune** Mob. : 72767 61763 | **Liyana Traders** Near Shani Mandir, Opp. **Shaniwar Wada, Pune** Mob. : 99233 00782 |
| **Harshada Enterprises** **Old Sangvi, Pune,** Mob. : 86258 85100 | **Yash Enterprises** Kalamkar Complex, Near Jupiter Hospital, **Baner,** Mob. : 83297 67125 |
| **Gauri Enterprises** Shop No.16, B Wing, Ground Floor, Kakde Plaza, **Karvenagar Road, Pune** - 52, Mob. : 96577 17421 | **Muktai Enterprises** At Somvar Peth, Near Rajpurohit , **Tasgaon** - 416 312. Mob: 87963 89698 |
| **Jai Maharashtra Tea** **Kamshet,** Naygon Vadgaon Maval. Mob. : 97665555532 | **Vedant Trading Company** Opp. Sadhana Mall, Near Lonavala Railway Station, **Lonavala,** Mob. : 70833 21475 |
| **Balaji Enterprises** Handewadi, Juna Palkhi Road, **Hadapsar,** Mob. : 9730305070/7020264375 | **Kedareshwar Masale** Near Bhoiraj Ganesh Mandir, Fish Market, **Shirwal,** Mob: 78759 83226 |

Spices | Pickle | Papad | Thecha | Chutney | Instant Mixes | RTC